cmyk

## संपादकीय

### टाळी देण्याची घटिका समीप आली

केंद्र सरकारच्या आदेशावरून महाराष्ट्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राला विरोध म्हणून आणि त्यातही हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी ५ जुलै रोजी एका महामोर्चाचे आयोजन केले होते. हिंदी सक्तीचा जिआर शासनाने रद्द केल्याने हा मोर्चा स्थगीत करण्यात आला मात्र तरीसुद्धा या दोन ठाकरे बंधुचा कार्यक्रम एकत्र घेतला जाणार आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com






बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६८ | मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# जुलै महिन्यात राज्यात सर्वदूर पावसाचा अंदाज; शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात जुलै महिन्यात दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज आहे. जून महिन्यात चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागात पेरणीला गती मिळाली. आता जुलै महिन्यातही राज्यातील शेतकऱ्यांना पाऊस दिलासा देण्याची शक्यता अधिक असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महोपात्रा यांनी सोमवारी (ता.३०) पत्रकार परिषद घेऊन



जुलै महिन्यातील पावसाचा अंदाज जाहीर केला.

१९७१ ते २०२० च्या आकडेवारीनुसार जुलै महिन्यात संपूर्ण देशात दीर्घकालीन सरासरीच्या २८०.४ मिमी पाऊस पडतो. यंदा जुलै महिन्यात देशाच्या बहुतांशी भागात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता अधिक आहे. तर ईशान्य भारतातील राज्ये, पूर्व भारत, दक्षिण द्वीपकल्प आणि वायव्य भारताच्या काही भागात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता अधिक असल्याचं हवामान विभागाने सांगितले आहे. हवामान विभागाने जुलै महिन्यात सरासरीच्या १०६ टक्के पावसाचा अंदाज दिला आहे. महाराष्ट्रातील कोकण, मध्य महाराष्ट्र, घाटमाथ्यासह आणि पूर्व विदर्भात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता अधिक असल्याचा अंदाज दिला आहे. तसेच मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भाच्या बहुतांश भागात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता अधिक आहे, असेही हवामानशास्त्र पान २ वर

### पुर्ण हंगामात १०८ टक्के पावसाचा अंदाज

देशात मॉन्सून हंगामात जून ते सप्टेंबर दरम्यान सरासरीच्या १०८ टक्के पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यंदा मे महिन्यात उच्चांकी पावसाची नोंद झाली. जून महिन्यातही राज्यात पावसाने सरासरी गाठली. मात्र पावसाचे वितरण असमान असल्याचे दिसून आले. जुलै महिन्यात मात्र राज्यात सर्वदूर चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्याच्या सर्वच भागात सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता अधिक असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# बीड मधील लैंगिक छळ प्रकरण चांगलेच तापणार

### धनंजय मुंडे यांनी घेतली फडणवीस, अजित पवारांची भेट, महिला आयपीएस अधिकाऱ्यामार्फत तपास होण्याची शक्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी बीड शहरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची विधानभवन मुंबई येथे भेट घेऊन या प्रकरणात बीड जिल्ह्या बाहेर सेवेत असलेल्या एका अनुभवी आयपीएस दर्जाच्या महिला पोलिस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करून स्वतंत्र चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे.**





बीड शहरातील उमाकिरण संकुलात आरोपी विजय पवार व प्रशांत खटोकर यांनी अल्पवयीन मुलीवर केलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी दोन्ही आरोपींना पोलिसांनी वैद्यकीय रजेवर व अन्य तालुक्यात नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यामार्फत नाट्यमय रित्या अटक केली असून, या प्रकरणात सुरू असलेला तपास समाधानकारक नाही, तसेच याप्रमाणे अनेक मुलींचे लैंगिक शोषण या नराधमांनी केले असून त्यांना असलेल्या स्थानिक राजकीय पाठबळमुळे इतर पीडित मुली तक्रार द्यायला धजावत नाहीत, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दबावातून या आरोपींना वाचवण्याचे काम केले जाऊ शकते, त्यामुळे या प्रकरणात पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी एका महिला आयपीएस अधिकारी यांच्यामार्फत स्वतंत्र निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. या प्रकरणी तपासात डिजिटल पुरावे गोळा करणे ही प्राथमिकता होती, मात्र आरोपी, त्यांचे नातेवाईक, मदत करणारे यांचे सीडीआर, पान २ वर

### आमदारासोबत असलेले संबंध तपासा

दरम्यान संबंधित आरोपींपैकी विजय पवार यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता असून, ते स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत अनेक व्यवहार एकत्र करतात, बेनामी जमिनी, प्लॉट, रेड झोन मध्ये खाजगी शाळेचे बांधकाम असे अनेक काळे कारनामे यांनी संगनमताने केले असून याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

### आरोपींवर कडक कारवाई करा ना.पंकजाताई मुंडेंच्या एसपींना सूचना

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात कोचिंग क्लास मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा लैंगिक छळ करणाऱ्या आरोपींविरुद्ध कठोर आणि कडक कार्यवाही करा अशा सूचना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एसपींना केल्या आहेत. या घटनेविषयी ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी नुकतीच घटनेची माहिती घेवून याविषयी सूचना केल्या. ही घटना अतिशय संतापजनक आणि जिल्ह्याला काळीमा फासणारी आहे, शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरूपाचे आहे, त्यांना ताब्यात घेतले असले तरी ते सुटले जावू नयेत, यासाठी त्यांचेवर तात्काळ कडक कार्यवाही करावी अशा सूचना ना. पंकजाताई मुंडेंनी केल्या आहेत. यासंदर्भात आणखी पालकांच्या तक्रारी असल्यास त्यांना शासनाची संपूर्ण सुरक्षा दिली जाईल, त्यांनी यासाठी पुढे यावे असे आवाहनही ना. पंकजाताईंनी केले आहे.



# बीडमध्ये महिलांनी काढला कॅन्डल मार्च

### अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणी नागरिकांमधून संताप



**बीड । प्रतिनिधी**

**शहरात अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळप्रकरणी संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि.३०) सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात कॅन्डल मार्च काढून निषेध व्यक्त केला. यावेळी सर्वस्तरातील महिला, युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.**

हातात कॅन्डल्स व मागण्यांचे फलक घेत सहभागी महिलांनी मुलगी आहे, अबला नाही, अत्याचाऱ्यांना माफी नाही; बीड जागं झालं, न्यायासाठी उभं राहिलं; नराधमांनो, चुकीला माफी नाही आणि एसआयटी स्थापन झालीच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. या कॅन्डल मार्चच्या माध्यमातून केवळ नराधम आरोपीच नाही, तर त्यांना पाठीशी घालणाऱ्या लोकप्रतिनिधींचाही निषेध करण्यात आला. ठोस कारवाई न झाल्यास मोठे आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी सर्वस्तरातील पान २ वर

# स्व.विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यास जनसागर लोटला

### जड अंत:करणाने उपस्थितांनी केली श्रद्धांजली अर्पण

**बीड । प्रतिनिधी**

**लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. ३० जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली.सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी पार पडला यावेळी सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह, शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मेटे साहेबांवर प्रेम करणारे असंख्य चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब पान २ वर

# विधान परिषदेच्या तालिका सभापतीपदी डॉ.प्रज्ञा सातव

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सभागृहाच्या कामकाजा दरम्यान विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या उपाध्यक्षा आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव यांची विधान परिषदेच्या तालिका सभापतीपदी निवड जाहीर केली.**



महाराष्ट्र विधीमंडळच्या पावसाळी अधिवेशनास सोमवारपासून सुरुवात झाली असून, अधिवेशनासाठी विधान परिषदेच्या तालिक सभापती आ.डॉ. सातव यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यांनी आपल्या आजवरच्या कार्यकाळात जिल्ह्यातील व राज्यातील जनसामान्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सभागृहात आवाज उठवून सरकारचे लक्ष वेधले होते. पान २ वर

# महामार्गावरील अतिक्रमणे काढा; अपघातस्थळी रूग्णवाहिका तातडीने पाठवा

### जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात विविध रस्त्यावर ब्लॅकस्पॉट आहेत. शिवाय राष्ट्रीय महामार्गावर अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे अपघात होत असून अपघात टाळण्यासाठी अतिक्रमणे काढा आणि अपघातस्थळी तातडीने रूग्णवाहिका पाठवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.**




जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजीत केली होती. यावेळी खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पान २ वर

# छत्रपती संभाजीनगरात थरारनाट्य

### बालसुधारगृहातून ९ अल्पवयीन मुलींचे सिनेस्टाईल पलायन, पाठलाग करणाऱ्या पोलिसांवर दगडफेक



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

शहरातील छावणी परिसरातील बालसुधारगृहाची सुरक्षा व्यवस्था भेदून नऊ अल्पवयीन मुलींनी पलायन केल्याची एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एखाद्या चित्रपटाच्या कथानकालाही लाजवेल अशा या सिनेस्टाईल पलायनानंतर, पोलिसांनी तात्काळ सूत्रे हलवत जालना रोडवर थरारक पाठलाग करून सात मुलींना ताब्यात घेतले. मात्र, दोघीजणी अद्यापही फरार असल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील छावणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पान २ वर

# आरएसएसचा अजेंडा राबविण्यासाठी हिंदीबाबत जनमत चाचणी

### मुख्यमंत्र्यांचे 'एकला चलो रे' दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना हिंदी सक्तीची माहितीच नव्हती–हर्षवर्धन सपकाळ

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

हिंदी–हिंदू–हिंदूराष्ट्र हा राष्ट्रीयस्वयंसेवक संघाचा अजेंडा राबविण्यासाठी महाराष्ट्रातील महायुती सरकार कार्यरत आहे. पहिल्यापासून हिंदी भाषेची सक्ती या अजेंड्याचाच भाग आहे. सरकारने हिंदी सक्तीचा शासनआदेश काढून याबाबत जनमत काय आहे हे तपासून पाहिले. महाराष्ट्र या विरोधात ठामपणे उभा राहिला म्हणून त्यांनी हा निर्णय मागे घेतला आहे. अधिवेशनाच्या तोंडावर या माध्यमातून सरकारचा नाकर्तेपणा आणि जनतेला भेडसावणाऱ्या ज्वलंत प्रश्वांवरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्नही सरकारने केला अशी घाणाघाती टीका महाराष्ट्र पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०२.५० क्विंटल | २,४६० | २,७०० | २,५८४ |
| ज्वारी/हायब्रिड : ८५.०० क्विंटल | २,२०० | २,९१० | २,४५१ |
| मका/लोकल:८.५० क्विंटल | २,२२५ | २,२२५ | २,२२५ |
| तूर : ३०.५० क्विंटल | ५,०१० | ६,६५० | ६,२४५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ५३.५० क्विंटल | १,९३१ | २,६७० | २,२९६ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:९.५० क्विंटल | ४,२५१ | ४,२५१ | ४,२५१ |
| हरभरा: ३३.०० क्विंटल | ५,३०० | ५,४५१ | ५,३८७ |

# पर्यावरण मंत्री ना.पंकजा मुंडे यांची ईव्ही कारमधून विधानभवनात एंन्ट्री

### प्रदुषणमुक्त महाराष्ट्रासाठी दिला प्रतिकात्मक संदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधीमंडळ अधिवेशनाच्या आजच्या पहिल्याच दिवशी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची विधानभवनात इलेक्ट्रिक वाहनाने धमाकेदार एन्ट्री झाली. प्रदूषण मुक्त महाराष्ट्रासाठी प्रतिकात्मक संदेश देत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.**



पर्यावरण मंत्री या नात्याने दैनंदिन प्रवासासाठी इलेक्ट्रिक वाहन वापरण्याचा मनोदय व्यक्त करत तशा सूचना त्यांनी काही दिवसांपूर्वी विभागाला दिल्या होत्या, त्यानुसार विभागाकडून महिंद्रा कंपनीची इलेक्ट्रिक कार त्यांना आज उपलब्ध झाली. आजपासूनच विधीमंडळाचे अधिवेशन सुरू झाले असल्याने याच ईव्ही कारमधून त्यांनी रामटेक शासकीय निवासस्थान ते विधानभवन असा प्रवास केला, त्यांचेसमवेत नगर विकास राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ हया देखील होत्या. दरम्यान, सकाळी रामटेक निवासस्थान येथे त्यांनी ईव्ही कारची विधीवत पूजा केली. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी यावेळी त्यांना महिंद्रा एक्सईव्ही नाईन–ई या मॉडेलची चावी सुपूर्द केली.

> **"विधानभवनात आल्यानंतर यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, पर्यावरण मंत्री या नात्याने प्रदुषण कमी व्हावे यासाठी इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास करत प्रतिकात्मक संदेश देत आहे.या वाहनाने दूरचा प्रवास करणे मला थोडे कठीण जाईल पण मुंबईत तरी ते शक्य होईल, त्यामुळे इव्ही कार वापरण्याचे मी ठरवले. अनेकांना माझं हेच आवाहन असेल की त्यांनी अशा वाहनांचा वापर करावा जेणेकरून वातावरणातील प्रदुषण कमी होण्यास फार मोठी मदत होईल.**

cmyk

## अग्रलेख

# टाळी देण्याची घटिका समीप आली


केंद्र सरकारच्या आदेशावरून महाराष्ट्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राला विरोध म्हणून आणि त्यातही हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी ५ जुलै रोजी एका महामोर्चाचे आयोजन केले होते. हिंदी सक्तीचा जिआर शासनाने रद्द केल्याने हा मोर्चा स्थगीत करण्यात आला मात्र तरीसुद्धा या दोन ठाकरे बंधुचा कार्यक्रम एकत्र घेतला जाणार आहे. ही विजयी सभा असेल किंवा याला दुसरे काही नाव दिले जाईल शिवाय तारिख ५ जुलै नसेलही मात्र हे दोघे बंधू एकमेकांना टाळी देणार, हे जवळपास निश्चित झाले आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये सातत्याने ठाकरे बंधू एकत्र येणार की नाहीत याबाबत चर्चा सुरु आहे. राज ठाकरे यांच्या बाजूने काही वर्षापूर्वी त्या दिशेने प्रयत्न झाले तरी त्यांच्या टाळीला तेव्हा उद्धव ठाकरे यांच्याकडून प्रतिटाळी न मिळाल्याने राज ठाकरे यांनी पुन्हा तो प्रयत्न केला नाही. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या निमित्ताने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला जवळ केल्यानंतर राज ठाकरे यांनी काही काळ भाजपशीही जवळीक साधली होती. अशाप्रकारे दोन ध्रुवावर वावरणाऱ्या या बंधूंना या महामोर्चाच्या निमित्ताने का होईना एकत्र येण्याची बातमीने त्यांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांमध्येसुद्धा उत्साह निर्माण झाला.

महामोर्चाचा विषय निघण्यापूर्वी गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये सातत्याने दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार का याबाबत चर्चा सुरू होत्या. खरे तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी या विषयावरील मोर्चासाठी वेगळ्या तारखा निवडल्या होत्या. पण नंतर विचार विनिमय करून एकाच दिवशी संयुक्त मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता ही एक सकारात्मक गोष्ट मानावी लागेल. उद्धव ठाकरे यांच्यासाठी आगामी काळात होणारी मुंबई महापालिका निवडणूक सर्वात महत्त्वाची आहे. या निवडणुकीसाठी जर आत्तापासूनच वातावरण निर्मिती होणार असेल तर ते त्यांना पाहिजेच आहे. राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्षसुद्धा नेहमी चर्चेत राहणारा पक्ष असल्याने त्यांच्यासाठीसुद्धा आगामी सर्वच महापालिका निवडणुका महत्त्वाच्या असल्याने या निमित्ताने सकारात्मक वातावरण निर्मिती झालेली राज ठाकरे यांनासुद्धा हवी आहे. अर्थात, सध्या राज्यात सत्तेवर असलेल्या देवेंद्र फडणवीस सरकारचीसुद्धा या मोर्चाकडे नजर होती आणि शक्यतो मोर्चाची वेळ येणारच नाही याची काळजी आम्ही घेऊ, असे जे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले होते, तेसुद्धा महत्त्वाचे होते आणि झालेही तसेच.

ठाकरे बंधूंनी काढलेल्या मोर्चाचा परिणाम काय होईल याची कल्पना महायुतीच्या नेत्यांना असल्यानेच हा मोर्चा होऊच नये यासाठी हा प्रयत्न झाला आहे. महायुती सरकार काही पावले मागे आले आहे. राज्यात हिंदी सक्ती नाही मराठी सक्ती आहे, असे सातत्याने सरकारकडून सांगितले जात असले तरी हा विषय कोणाला पटलेला नाही. साहजिकच सर्वसामान्य नागरिकांना पटेल आणि राजकीय पक्षांनासुद्धा समजून येईल अशा प्रकारचा निर्णय आता फडणवीस सरकारने घतला आहे. ठाकरे बंधूंनी मोर्चा काढला म्हणून फडणवीस सरकारने माघार घेतली या प्रकारच्या नॅरेटिव्हपेक्षाही या मोर्चापूर्वीच याबाबत निर्णय घेऊन मोर्चा होणार नाही हे फडणवीस सरकारला जास्त सोयीचे ठरले आहे. अर्थात, ठाकरे बंधूंनी ठरवलेला हा मोर्चा झाला काय किंवा नाही झाला काय दोघांसाठी ही एकत्रीकरणासाठी आणखी एक पायरी ठरणार आहे हे मात्र निश्चित. हिंदी सक्तीला विरोधाच्या भूमिकेतून महाराष्ट्राची राजकीय समीकरणे पुन्हा एकदा बदलून जाण्याचे संकेत निश्चितच या महामोर्चाच्या नियोजनाने दिले. ठाकरे बंधूंनी एकमेकांना या निमित्ताने दिलेल्या टाळीची गुंज किती काळ ऐकू येणार आहे हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# नो पार्किंग व हेल्मेट न लावल्याने पोलिसांनी २४ वाहनांवर २४ हजार रुपये दंडात्मक केली कारवाई



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टीतील न्यायालयात व तहसिल कार्यालयाच्या परिसरात नो पार्किग असलेल्या जागी गाड्या अस्तव्यस्त पद्धतीने उभ्या केल्यामुळे आणि शासकीय कार्यालयातील कर्मचारी यांनी हेल्मेट न वापरल्याबद्दल पोलिसांनी २४ मोटार सायकल वाहनांवर एकुण २४ हजार रुपये दंडात्मक कारवाई केली आहे.**

आष्टी शहरातील शासकीय कार्यालयात व चौका चौकात अनधिकृत पार्किंग नो पार्किंग असलेल्या ठिकाणी वाहने उभी केल्यास ती अडथळा निर्माण करतात आणि रहदारी नियमांचे उल्लंघन होते. यासाठी आष्टी पोलिसांनी सोमवार दि ३० जून रोजी सकाळी ११ ते २ वाजेच्या सुमारास तहसिल कार्यालय परिसरात व न्यायालय परिसरात अस्ताव्यस्त वाहन लावणे व मोटार सायकल चालवताना तहसील कार्यालय, नगरपंचायत कार्यालयातील कर्मचारी यांनी हेल्मेट न लावल्याने त्यांच्या विरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एकूण २४ वाहनांवर कार्यवाही करण्यात आली व त्यांच्याकडुन २४ हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे. सदर कारवाई पोलिस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या आदेशाने पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,ए एस आय मिसाळ, पोलिस शिपाई विलास गुंडाळे, पोलिस हवालदार नितीन काकडे,पोलिस शिपाई तांबे, पोलिस शिपाई वाणी यांनी कारवाई केली आहे.

# चांगल्या शिक्षणामधूनच जीवनमान उंचावू शकते—माजी आ.मोहनराव सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सर्वसामान्य लोकांचे जीवनमान सुधारावयाचे असेल तर ते शिक्षणाच्या माध्यमातूनच शक्य आहे,आणि चांगले शिक्षण हे चांगल्या शिक्षकांच्या कार्यावर अवलंबून असते,लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठीच शिक्षण संस्था उभारलेल्या आहेत, त्यात चांगले शिक्षक लाभले आणि त्या माध्यमातून पुढील पिढीचे जीवनमान उचावण्यासाठी काम करता आले, असे मत शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी व्यक्त केले.**



ते माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयातील मुख्याध्यापक प्रवीण गजकुमार घोडके यांच्या सेवानिवृत्तीच्य सपत्नीक सत्कार समारंभाच्या अध्यक्षीय समारोपात बोलत होते.या वेळी मंचावर संस्थेचे सचिव आर.व्ही.सोळंके, ज्ञानेश्वर सोळंके, महावीर घोडके, अशोक बोचरे, आर.एफ.शेख,गणेश काशीद हे उपस्थित होते. महात्मा फुले विद्यालय मोठीवाडी येथे कार्यरत असलेले प्रवीण घोडके नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले, त्यांनी संस्थेत अतिशय उत्कृष्ट काम केले त्याबद्दल त्यांचा व त्यांच्या सहचारिणी कविता घोडके यांचा शाळेतील सहकारी, गावकरी व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.याप्रसंगी माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी बोलताना पुढच्या पिढीला चांगले घडवत असताना,त्यांचे जीवनमान उंचावत असताना शिक्षक आणि शिक्षण संस्था यांच्या भूमिका महत्त्वाच्या असतात आणि प्रवीण घोडके यांनी आपले कार्यक्षमपणे बजावले,अशा शिक्षकांमुळेच संस्थेमधून चांगले विद्यार्थी घडत आहेत असे मत व्यक्त केले. मुख्याध्यापक प्रविण घोडके हे आपले मनोगत व्यक्त करताना उपस्थित विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले. विद्यार्थीनी सरिता खेत्री,सिद्धी गोंडे यांनी सूत्रसंचालन केले,सरिता खेत्री हिने उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक उत्तम राठोड,रामराज मुंडे,संजीवन लाड,अजय सोळंके, सुधाकर गणोरकर,नारायण कांबळे व विद्यालयातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### जुलै महिन्यात राज्यात सर्वदूर

विभागाने म्हंटले आहे. त्यामुळे राज्यात जुलै महिन्यात सर्वदूर पावसाची शक्यता अधिक आहे. तसेच देशात जुलै महिन्यात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी राहिल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. लडाख, बिहार, पूर्वोत्तर राज्ये आणि दक्षिण भारतात कमाल तापमान सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. मध्य भारत, उत्तर भारत वगळता देशभरात किमान तापमान सरासरीच्या वर राहण्याची शक्यता अधिक आहे.

---------

बीडमध्ये महिलांनी

महिला, कार्यकर्त्यांसह नागरिकांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कॅण्डल मार्चचा समारोप झाला.

पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू राहणार

आरोपींना मदत करणाऱ्या व्यक्तींना सहआरोपी करण्यात यावे. प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावी. चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्यांकडूनच करण्यात यावी. पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू ठेवला जाईल, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

---------------

बीड मधील लैंगिक छळ

आयपीडीआर, व्हॉटसअप चॅट, इन्स्टा, चॅट, प्रायव्हेट कॉलिंग, मोबाईल डेटा मधील व्हिडिओ, फोटो, व्हॉटसअप कॉल, फेस टाईम कॉल यांपैकी पोलिसांनी अद्याप काहीही ताब्यात घेतले नसल्याची माहिती आहे, तसेच संकुलात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये १३ जून पूर्वीचे फुटेज उपलब्ध नाही, अशा अनेक त्रुटी पोलीस तपासात दिसून येत असल्याचा उल्लेखही धनंजय मुंडे यांनी केला आहे.

या प्रकरणातील पीडिता व तिच्या कुटुंबीयांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निकटवर्तीयकडून धमकावले जात असून तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणला जात आहे, अशाच प्रकारच्या दबावामुळे इतर पीडित मुली समोर येऊन तक्रार द्यायला धजावत नाहीत, असेही मुंडेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे. पवार व त्याच्या गँग ने कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांची फी वसुली केलेली आहे. तसेच वेळेत फी भरू न शकलेल्या गरीब कुटुंबातील मुलींना टार्गेट केले आहे. क्लासेस च्या नावाखाली केली जाणारी ही आर्थिक लूट थांबावी, यासाठी बीडच नव्हे तर सबंध राज्यातील कोचिंग क्लासेस चालकांना फी मर्यादा, वसुली, विद्यार्थ्यांची सुरक्षा यांसारख्या कायदेशीर व नैतिक संहिता लागू करण्यासाठी एक धोरण निश्चित केले जाऊन तशी नियमावली निर्गमित केली जावी, अशी मागणी देखील धनंजय मुंडे यांनी केली आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी दिले आहे.

-----------

महामार्गावरील अतिक्रमणे काढा;

मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अपघाताचे प्रमाण हे सायंकाळी व पहाटे जास्त असते. या दरम्यान आपल्या यंत्रणेने सतर्क राहायला हवे. जिल्ह्यात अनेक असे अतिक्रमण आहेत, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. ते अतिक्रमण काढण्याचा सूचना केल्या. विशेषत: गेवराई तालुक्यातील गढी भागात अनेक वेळा अपघात झालेले आहेत. त्या ठिकाणी तांत्रिक सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. जिल्ह्यात कोठेही अपघात झाला तर त्या ठिकाणी रुग्णहिका तात्काळ मिळावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सूचना केल्या. माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे असे म्हणत, लोकांची अडवणूक होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला. दरम्यान, तेलगाव या ठिकाणी रस्त्याचे पाणी व्यवस्थित न काढल्यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. ते दुरुस्ती करण्यात यावे. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे स्वतंत्र ऑफिस बीड जिल्ह्यात होण्यासाठी आर.ओ ऑफिसला प्रस्ताव पाठवा, अशा सुचना देखील दिल्या. राष्ट्रीय महामार्ग संस्थेचे स्वतंत्र कार्यालय बीडला झाल्यास जिल्ह्यातील कामे वेळेत मार्गी लागतील, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी -गढी- माजलगाव या महामार्गावरील तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा व इतर सर्व ठिकाणी रस्ते कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे अपघात होत असले बाबत तक्रारी होत आहेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, असेही म्हटले.

टॉप फाईव्ह विषयांना घातला हात

१. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४५८ डी व ४५८ सी या रस्त्यावरील प्रमुख शहराभोवती नवीन बायपास/ओव्हर ब्रिजेस (अंबाजोगाई -केज- नेकनुर-मांजरसुंबा-पाटोदा व माजलगाव शहर) करणे. या रस्त्यावरील अपघात होत असलेल्या भागातील दुरुस्तीची कामे तातडीने करणे.

२. पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव -केज- मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी वाहतुकीचा करणे. अंबाजोगाई शहरात यशवंतराव चव्हाण चौकामधे इलेव्हेटेड पादचारी मार्ग तयार करणे.

३. राष्ट्रीय महामार्ग सुरत-चेन्नई साठी संपादन करणे आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती बाबत सविस्तर चर्चा केली.

४. रामा ५४८ माजलगाव- धारूर -केज या रस्ता कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे तेथे दररोज अपघात होत आहेत. संबंधित एजन्सी कडून तातडीने आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्यात याव्यात. बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरी रस्ता करणे बाबत निविदा प्रक्रियेला वेग द्यावा.

५. पाटोदा व आष्टी तालुक्यातील पिठ्ठी-अंमळनेर-टाकळी काजी हा रस्ता तसेच गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा -उमापूर- शेवगाव हे दोन्ही रस्ते राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात यावा.

-------

पालखी मार्गाचे काम निकषाप्रमाणे पुन्हा करावे

पैठण- पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील डोंगरकिन्ही ते पारगाव घु.(अनपटवाडी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब आहे. तसेच मळेकरवाडी घाटातील डांबरीकरणाचे काम वारंवार सूचना देऊनही अद्याप सुरु झालेले नाही. या रस्त्याच्या संपूर्ण कामात जागोजागी मोठ-मोठ्या भेगा पडलेल्या आहेत त्यामुळे रोज दुचाकी/चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. पाटोदा शहरातील रस्ता काम अपूर्ण आहे. संपूर्ण रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील निकषाप्रमाणे प्रमाणे पुन्हा करून घेण्यात यावे. एजन्सीवर आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करावी. अतिरिक्त बाब या नावाने करण्यात आलेल्या अनावश्यक खर्चाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे खा.सोनवणे यांनी म्हटले.

------------

विधान परिषदेच्या तालिका

तसेच अनेक प्रश्न मार्गीही लावले होते. त्यांनी आजपर्यंत सभागृहात केलेल्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल विविध पुरस्काराने त्यांना गौरविण्यातही आले होते. या निवडीबद्दल सभागृहाच्या सदस्यांनी आ. सातव यांचे अभिनंदन केले.

-------

स्व.विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त

यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे यासाठीआज सकाळपासूनच गावो - गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते वस्ती , वार्ड, तांड्यावर त्यांना अभिवादन करत जयंती साजरी करण्यात आली. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले .तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले. लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले , कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पने उभा राहिले, व्यसमुक्तीसाठी लढा उभा केला , युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली. मराठा , मुस्लिम , धनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्टा केली आपण ''शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार'' अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मुंबई येथील बैठीकाला जाताना झाला. या लढवय्या नेत्याच्या जाण्याने समजा पोरका झाला आहे. अशा बहु आयामी लोकनेत्याला समाज कधीच विसरणार नाही. अशी भावना उपस्थित व्यक्त करत होते. यावेळी अनेकांना आपल्या भावना अनावर झाल्या अत्यंत जड अंतःकरणाने उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, दिलीप गोरे, नारायणराव काशिद, प्रा. सुभाष जाधव, राजेंद्र मस्के, उल्हास गिरम, बी.बी.जाधव, अनिल घुमरे, रमेश चव्हाण, डॉ.प्रमोद शिंदे, राजाभाऊ मोहाले, नारायणराव थोरात, निवृत्ती डोके, तुळशीराम पवार, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चौधरी, पंडित माने, प्रमोद कुलकर्णी महेश वाघमारे, संजय पवार, गोरख शिंदे, राजेश भुसारी, भास्कर गायकवाड, उदय जोगदंड, सुनील शिंदे ,बाळासाहेब खोसे,नवनाथ प्रभाळे, बाबासाहेब पाटील, लिंबराज वाघ, दोडके फैजी आदी सह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

६२ रक्तदात्याने केले रक्तदान

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक हिंगे, संजय पवार, अतुल लंगोरे आणि सुशील कांबळे यांनी रक्तदान करून शिबिराची सुरवात केली. या शिबिरात एकूण ६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.

----------

आरएसएसचा अजेंडा राबविण्यासाठीची

प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात माध्यमांशी संवाद साधताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, हा निर्णय मागे घेतला जाणार हे आम्ही तीन दिवसांपासून सांगत होतो. या निर्णयानंतर मराठी माणूस, साहित्यीक, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत संघटनांचे प्रतिनिधी व विरोधी पक्षांनी केलेल्या तीव्र विरोधामुळे सरकारला गुडघे टेकावे लागले. मराठी ही केवळ भाषा नाही ती आमची अस्मिता, संस्कृती व जीवनशैली आहे. काँग्रेसने सर्व भाषांचे महत्व जाणून भाषावार प्रांत रचना केली. सर्व भाषा आणि बोलीभाषा भावा भावाप्रमाणे हातात हात घालून चालल्या पाहिजेत ही काँग्रेसची भावना आहे. विविधतेत एकता ही भारताची विशेषता आहे, ती भाजपला नको आहे. एक राष्ट्र, एक भाषा, एक धर्म, एक नेता हा अजेंडा राबवण्याचा संघ व भाजपचा सुरुवातीपासूनचा प्रयत्न आहे. त्यांना संविधान मान्य नाही. संविधान तयार होऊ नये हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येमागचा एक उद्देश होता असा आरोपही यावेळी केला.

हर्षवर्धन सपकाळ शेवटी बोलताना म्हणाले की, ज्या भागात हिंदी बोलली जाते ती जमीन आपल्यासाठी सुपिक. जिथे इतर प्रादेशिक भाषा बोलल्या जातात तिथे भाजपाला यश मिळत नाही. त्यामुळे जो हिंदी बोलेल आणि नमस्ते सदावत्सले म्हणेल तोच हिंदू अशी विचित्र, विकृत आणि अधर्मी व्याख्या भाजपाला रुजवायची आहे. देश स्वतंत्र करण्यासाठी काँग्रेससह इतर लोक बलिदान देत होते, त्याग करत होते, त्यावेळी हे लोक इंग्रजांचे हस्तक म्हणून होते. त्यामुळे त्यांना या संघर्षाची किंमत माहित नाही. भाषा आणि धर्माच्या नावावर देश तोडण्यास भाजपा निघाली आहे. आम्ही ते होऊ देणार नाही देशाची एकता, अखंडता, लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेस पक्ष लढत राहील असा निर्धारही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

----------

छत्रपती संभाजीनगरात

बालसुधारगृहात विविध गुन्हे आणि अन्य कारणास्तव या नऊ अल्पवयीन मुलींना ठेवण्यात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, या मुलींनी पूर्वनियोजित कट रचून पलायनाचा मार्ग आखला. सुरक्षा रक्षकांची नजर चुकवून आणि सुधारगृहाच्या व्यवस्थेतील त्रुटींचा फायदा घेत या नऊ जणींनी एकाच वेळी पलायन केले. ही बाब प्रशासनाच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ शहर पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस यंत्रणा सतर्क झाली. नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या सूचनेनुसार, गस्तीवर असलेल्या दामिनी पथकाने तात्काळ जालना रोडच्या दिशेने धाव घेतली. रस्त्यावरून पळत जाणाऱ्या या मुलींना पाहून दामिनी पथकाने त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना पाहताच या मुली अधिक वेगाने पळू लागल्या. दामिनी पथकाने काही अंतरावर पाठलाग करून त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता, या मुलींनी उलट पोलिसांवरच हल्ला चढवला. त्यांनी रस्त्याच्या कडेला असलेले दगड उचलून दामिनी पथकाच्या दिशेने फेकण्यास सुरुवात केली. या अनपेक्षित हल्ल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रसंगावधान राखत आणि धाडस दाखवत दामिनी पथकाच्या महिला पोलिसांनी सात मुलींना पकडण्यात यश मिळवले. परंतु, या गोंधळाचा फायदा घेत दोन मुली गर्दीत मिसळून पळून जाण्यात यशस्वी झाल्या. पोलिसांनी तात्काळ पकडलेल्या मुलींना ताब्यात घेऊन छावणी पोलीस ठाण्यात आणले आहे.

या घटनेमुळे बालसुधारगृहांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एकाच वेळी नऊ मुलींचे पलायन आणि त्यानंतर पोलिसांवर हल्ला करण्याची त्यांची हिंमत, यावरून या प्रकरणाचे गांभीर्य दिसून येते. सध्या छावणी पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत असून, फरार झालेल्या दोन मुलींचा कसून शोध घेतला जात आहे.

-------------


**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९० दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३९ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३९ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.४०
पश्चिम : प्लॉट नं.३८
दक्षिण : प्लॉट नं. ४४
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**



**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९१ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४० सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/४० मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.४१
पश्चिम : प्लॉट नं.३९
दक्षिण : प्लॉट नं. ४३
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**



**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९२ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ४१ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/४१ मधील क्षेत्र ७४.४१ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- गट नं.३९ मधील जमीन
पश्चिम : प्लॉट नं.४०
दक्षिण : प्लॉट नं. ४२
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ७४.४१ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

# जादूटोण्याच्या संशयातून महिलेस मारहाण; एका महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जादूटोणा केल्याच्या संशयातून एका महिलेला घरात घुसून शिवीगाळ व मारहाण केल्याची गंभीर घटना अंबाजोगाई तालुक्यातील पोखरी येथे घडली आहे. या प्रकरणी एका महिलेसह चार जणांविरोधात अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलावती निकम या आपल्या पती व मुलांसह पोखरी येथे राहून शेती करून उपजीविका करतात. त्यांच्या फिर्यादीनुसार, त्या घरकाम करत असताना त्यांच्या भावकीतील ज्योतिराम दत्तू निकम, महादेव ज्योतिराम निकम, अशोक ज्योतिराम निकम आणि रंदावनी ज्योतिराम निकम या चार जणांनी त्यांच्या घरात घुसून त्यांच्यावर जादूटोणा केल्याचा आरोप करत शिवीगाळ केली. मोठ्या आवाजात वाद करत असताना त्यांच्यावर लाकडी काठीने वार करून दुखापत करण्यात आली. त्यांचा मुलगा नितीन यास देखील मारहाण करण्यात आली. या झटापटीत त्यांचे पती लहू व दुसरा मुलगा मनोहर यांना देखील शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. मारहाणीत जखमी झालेल्या कलावती यांच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार करण्यात आले. कलावती यांच्या तक्रारीवरून चारही आरोपींवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०१ जुलै २०२५



# कठीण परिश्रम केल्यास यश प्राप्त होते-माजी आ. केशवराव आंधळे

## महाराणी ताराबाई विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, भारतीय खो-खो विश्वचषक संघाच्या कर्णधार प्रियांका इंगळे यांची विशेष उपस्थिती

वडवणी । प्रतिनिधी

**आजच्या स्पर्धेच्या युगात खडतर परिश्रम केले तरच यश प्राप्त होते भारतीय खो-खो विश्वचषक संघाच्या कर्णधार कु.प्रियांका इंगळे यांनी कठीण परिश्रम घेऊन खो-खो खेळाचा सराव केला, भारताच्या विद्यमान राष्ट्रपती द्रोपदी मुरूम, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले परिश्रमाच्या जोरावर आपले कर्तृत्व सिद्ध केले तुम्ही सुद्धा त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन खडतर परिश्रम करून यश प्राप्त करू शकतात असं मत माजी आ.केशवराव आंधळे यांनी गुणवंतांचा कौतुक सोहळा या कार्यक्रमांमध्ये व्यक्त केले.**

वडवणी येथील, शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य स्थानी असलेल्या नामांकित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावी मार्च-२०२५ च्या बोर्ड परीक्षेमध्ये गुण अनुक्रमे वडवणी तालुक्यातून प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह गुणगौरव करण्यासाठी सोमवार दि.३० जून २०२५ रोजी महाराणी ताराबाई विद्यालयांमध्ये ‘‘गुणवंतांचा कौतुक सोहळा‘‘ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे कार्यवाहक तथा माजी आ.केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून भारताला पहिला खो-खो विश्वचषक जिंकून देणाऱ्या संघाच्या कर्णधार कु.प्रियंका हनुमंत इंगळे तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री.मधुकररावजी धस, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग अंडील, डॉ.खोटे साहेब, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या




धस, श्री.हनुमंतजी इंगळे, सौ.इंगळे मॅडम, शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, एसएम न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार सतीशजी मुजमुले, विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम, उपप्राचार्य मस्के सर पर्यवेक्षक धाईतिडक सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा बुके देऊन वेदोचित सत्कार करण्यात आला.

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता-१० वीतील बोर्ड परीक्षेमध्ये गुण अनुक्रमे वडवणी तालुक्यातून प्रथम क्रमांक आलेली कु.हर्षदा नाईकवाडे तसेच द्वितीय क्रमांक- कु.साक्षी खाडे तर तृतीय क्रमांक- कु.समृद्धी पाटोळे, कु.निकिता झाडे इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत विज्ञान शाखेतून प्रथम क्रमांक आलेली कु.पायल धाईतिडक तसीच द्वितीय क्रमांक कु.प्रतीक्षा लोंढे तर तृतीय क्रमांक चि.प्रतीक धाईतिडक व इयत्ता बारावी कला शाखेतून बोर्ड परीक्षेत वडवणी तालुक्यातून प्रथम क्रमांक आलेला चि.केशव हिरे तर द्वितीय क्रमांक कु.तनुजा राऊत तसीच तृतीय क्रमांक कु.दिव्या डोंगरे या सर्व महाराणी ताराबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह मान्यवरांच्या शुभहस्ते बुके व स्मृतीचिन्ह देऊन गुणगौरव करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु.साक्षी खाडे हिने आपले विचार व्यक्त केले त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या कु.प्रियांका इंगळे यांनी विचार व्यक्त करताना म्हणाल्या की, महाराणी ताराबाई विद्यालयातील इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थिनींसी संवाद साधताना मला खूप आनंद होतोय दिल्ली या ठिकाणी झालेल्या खो-खो विश्वचषकामध्ये २३ देशाने सहभाग घेतला होता तुम्ही सुद्धा क्रीडा क्षेत्रामध्ये आपलं करिअर करू शकतात असमत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपपर विचार माजी आ.केशवराव आंधळे यांनी प्रेरणादायी विचार व्यक्त करून गुणवंत विद्यार्थी, पालक व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.सर आणि श्री.विष्णू आंधळे सर यांनी केले व उपस्थितांचे आभार ठोंबरे सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी कार्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी त्यांचे पालक, पत्रकार यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

## स्वराज्य जनजागृती परिषदेच्या

करत आहेत. त्यामुळे संघटनेची बांधणी प्रभावशाली रीतीने होईल. कार्यकर्त्यांना दिशा देण्यासाठी लवकरच विश्वस्त मंडळाची एक बैठक घेतली जाणार आहे.यानंतर कार्यकर्त्यांचे जिल्हास्तरीय मेळावे, बैठका आणि राज्यस्तरीय मेळावा याबाबत सर्व कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येणार आहे. चारित्र्य संपन्न, भ्रष्टाचाराचा कसलाही डाग नसलेला, स्वार्थ बाजूला ठेवून आदर्शाची कास धरून चालणारा आणि समाज हितासाठी वाहून घेणारा प्रामाणिक कार्यकर्ता जोडणे, हा आमचा उद्देश आहे. लोकशिक्षण आणि लोकजागृती ही सध्या आवश्यक आहे. समाजाचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे लोकशिक्षण आणि लोक जागृती हा प्रमुख गाभा मानण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न आणि समाजाला भेडसावणाऱ्या सर्व समस्या, समाजात शांतता अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न करून समाज हिताचे काम करण्याची मनोमन इच्छा असणाऱ्या चांगल्या कार्यकर्त्यांचा शोध घेऊन असे कार्यकर्ते देखील नव्या संघटनेशी जोडण्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्न करणार आहेत. ॲड. अजित देशमुख आणि पदाधिकाऱ्यांवर या निमित्ताने शुभेच्छांच्या वर्षा होत आहे.

## खा.सुप्रीयाताई सुळे यांचा

साजरा करण्यात आला. जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील, पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या मार्गदर्शनाने अनेक उपक्रम राबवण्यात आले. सकाळी ११ वाजता उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर १२ वाजता विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अरुण गुट्टे, पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ॲड.सतीश देशमुख, डॉ.संदीपान काळे, नितीन शिंदे, मुक्ताराम गवळी, रमेशराव ढाकणे, पांगरीचे राजेभाऊ फड, रामभाऊ राडकर, वर्षाताई रायभोळे, दिपाली सावंत, मंगलताई सोळंके, फिरोज सय्यद, रामचंद्र देवकते, रेखाताई जानराव, अश्विनीताई सरवदे, समाधान मुंडे, सनी मस्के, डॉ.बोरा, गोपाळ सलगर, हनुमंत फड, प्रल्हाद गित्ते, इमरोज खान, शेख फिरोज, प्रद्युम्न मुंडे यांच्यासह अनेकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पेट्रोलपंप चालकाच्या

अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. पोलीस, कोपले आणि पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून दोघा चोरट्यांना पकडले. त्यांनी आपली नावे सुनिल अण्णा बोटे (रा. देववाडी, सांगली), धनंजय बालाजी गायकवाड (रा. दगडवाडी, लातूर) अशी सांगितली. तिसऱ्या फरार आरोपीचे नाव योगेश गायकवाड (रा. च-हाटा, बीड) असल्याची माहिती मिळाली असून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांनी स्कॉर्पिओ गाडीची झडती घेतली असता, त्यामध्ये डिझेलने भरलेले ६ कॅन, बनावट पिस्टल, तीन मोबाईल फोन्स, स्क्रूड्रायव्हर, टॉर्च व रबरी पाईप आढळले. या प्रकरणी राहुल कोपले यांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबाजोगाई ग्रामीण पोलीस अधिक तपास करत असून फरार आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. हा प्रकार केवळ डिझेल चोरीपुरता मर्यादित न राहता, शस्त्र दाखवून धमकी देण्यापर्यंत पोहोचला असल्याने या गुन्ह्याचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. दरम्यान, राहुल कोपले यांनी समयसूचकतेसह दाखवलेल्या धाडसाचे कौतुक होत आहे.

## शक्तिपीठ महामार्गावरून मराठवाड्यात

उत्तम उदाहरण आहे.दरम्यान, शेतमालाच्या आयातीस मोकळे रस्ते करून देणाऱ्या सरकारने देशांतर्गत शेतकऱ्यांच्या पोटावर लाथ मारण्याचा उद्योग सुरू केला आहे. सोयाबीन, मका यांसारख्या पिकांची आयात करत देशांतर्गत बाजार कोसळवण्याचा डाव सुरू आहे. हे सर्व शेतीच्या बाजूने असल्याचा दिखावा करत प्रत्यक्षात भांडवलदारांच्या फायद्यासाठी राबवले जाणारे कटकारस्थान आहे, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांत आहे. किसान सभेने देखील या लढ्याला उघड पाठिंबा दिला असून, हे आंदोलन शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी निर्णायक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे एक जुलै कृषिदिनी अंबाजोगाई तालुका ठप्प होणार हे निश्चित दिसून येत आहे.

## पावसाळी अधिवेशनाच्या

मिळविणे, तसेच परिचर वर्ग-४ पदांवरुन कनिष्ठ सहाय्यक वर्ग-३ पदांवरील ४०:५०:१० या प्रामाणातील पदोन्नती कोटा पुर्ण होईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया निरंतर राबविणे, जिल्हा परिषदेच्या आरोग्य व पशुसवंर्धन विभागांतील रिक्त पदे तात्काळ सरळसेवेने भरती प्रक्रिया राबविणे, राज्य शासनांच्या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या बरोबरीने जिल्हा परिषदेंच्या चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना २५०/- रूपये धुलाई भत्ता होणे, जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीचा पहिला लाभ एस-३ (१६६००-५२४००) ऐवजी एस-३ (१९९००-६३२००) होणेसाठी तसेच कनिष्ठ सहाय्यक लिपीक पदांप्रमाणेच कनिष्ठ सहाय्यक लेखा या पदांवर देखील पदोन्नती / सरळसेवा / वाहनचालकांतून नामनिर्देशनाने हे प्रमाण ४०:५०:१० या व इतर मागण्या पदरांत पाडून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचा-यांनी भाऊसाहेब पठाण (अध्यक्ष, राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबई.) यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे दि.९ जुलै २०२५ पासून होत असलेल्या बेमुदत उपोषण आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन मुकुंद तुरे (राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटना.) यांनी केले आहे.

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९९३ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३७ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३७ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३८
पश्चिम : प्लॉट नं.३६
दक्षिण : प्लॉट नं. ४६
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८८ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३६ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३६ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३७
पश्चिम : प्लॉट नं.३५
दक्षिण : प्लॉट नं. ४७
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८७ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३५ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३५ मधील क्षेत्र ७५.२९ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३६
पश्चिम : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण : प्लॉट नं. ४८
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ७५.२९ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९१ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १३ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१३ मधील क्षेत्र ६२.०४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १२
उत्तरेस : प्लॉट नं. १४

या वरील चतुः सिमा मधील ६२.०४ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९२ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १४ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१४ मधील क्षेत्र ६२.०८ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १३
उत्तरेस : प्लॉट नं. १५

या वरील चतुः सिमा मधील ६२.०८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९३ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १५ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१५ मधील क्षेत्र ९९.५८ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १४
उत्तरेस : रोहाऊस नंबर ०१

या वरील चतुः सिमा मधील ९९.५८ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३९० दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १२ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१२ मधील क्षेत्र ६२.०० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. ११
उत्तरेस : प्लॉट नं. १३

या वरील चतुः सिमा मधील ६२.०० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३८९ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ११ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/११ मधील क्षेत्र ६१.९६ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. १०
उत्तरेस : प्लॉट नं. १२

या वरील चतुः सिमा मधील ६१.९६ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १२८२
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शाम दत्तात्रय गीरी रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं १३८८ दि. १०/०५/२०२३ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५३ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. १० सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/१० मधील क्षेत्र ९९.२४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम : गट नं. २३९मधील जमीन
दक्षिण : प्लॉट नं. ०९
उत्तरेस : प्लॉट नं. ११

या वरील चतुः सिमा मधील ९९.२४ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangi@gmail.com PH.no ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी-१२८१
दिनांक: ३०/०६/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार अंकुश भिकाजी बोबडे रा.ता.जि. औरंगाबाद यांनी नामे १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८९ दि. १९/१२/२०२२ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं १९५२ दिनांक:- २७/०६/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. बाळकृष्ण दासराव भाकरे २. देवेन बाळकृष्ण भाकरे रा.ता.जि. औरंगाबाद नावावर असलेला गट नं (२३९) मधील प्लॉट नं. ३८ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७४/३८ मधील क्षेत्र ५२.९० चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- प्लॉट नं.३९
पश्चिम : प्लॉट नं.३७
दक्षिण : प्लॉट नं. ४५
उत्तरेस : ९ मिटर कॉलनी अंतर्गत रोड

या वरील चतुः सिमा मधील ५२.९० चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.


**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी नगरपंचायत घनसांवगी**

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
मंगळवार दि.१ जुलै २०२४
४

# जमिनीचे वाद आता मिटणार! सरकारी अधिसूचना काय?

शेतजमिनीच्या वाटणीवरून अनेकदा भावांमध्ये किंवा कुटुंबांमध्ये वाद निर्माण होतात, जे अनेक वर्षं न्यायालयात अडकून राहतात. अशा वादांना आळा बसावा, शेतकऱ्यांची आर्थिक अडचण टळावी आणि शेतजमिनीचे व्यवहार अधिक पारदर्शक व्हावेत यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता शेतजमिनीच्या वाटपासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची नोंदणी करताना लागणारे नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, यासोबतच एक अटही ठेवण्यात आली आहे की, अशा वाटपाच्या दस्तांसाठी किमान १०० रुपयांचे मुद्रांक शुल्क मात्र भरावे लागणार आहे.

याआधी अशा दस्तांवर एक टक्के नोंदणी शुल्क आकारले जात होते, जे अनेक शेतकऱ्यांना परवडत नव्हते. त्यामुळे अनेक जण ही कागदपत्रं नोंदणीच करत नसत. परिणामी, भविष्यात जमिनीवर मालकी हक्कावरून वाद निर्माण होण्याची शक्यता वाढत होती. राज्य सरकारच्या नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने यासंबंधी अधिसूचना जाहीर केली असून,



ही माहिती महसूल विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेतजमिनीची वाटणी करताना वाटपाचा लेखी दस्त तयार करावा लागतो. पूर्वी या दस्तावर शेतजमिनीच्या एकूण हिश्श्यांमधील काही भागांच्या किमतीनुसार शुल्क आकारले जात होते. परिणामी, हे शुल्क शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात होते आणि त्यामुळे दस्तनोंदणी टाळली जात होती. दरवर्षी राज्यात जवळपास २५ लाख कागदपत्रांची नोंदणी केली जाते. त्यात शेतजमिनीच्या वाटपाशी संबंधित सुमारे एक ते दीड लाख दस्त असतात. ही संख्या ग्रामीण भागात विशेषतः जास्त असून शहरी भागात तुलनेने कमी आहे. नोंदणी शुल्क माफ केल्यामुळे आता ही संख्या वाढण्याची शक्यता आहे, आणि त्यामुळे भविष्यातील कायदेशीर वादही टाळता येतील, असे सरकारचे म्हणणे आहे. दुय्यम निबंधकांना देण्यात आलेल्या निर्देशांनुसार, आता शेतजमिनीच्या वाटपाचे दस्त केवळ १०० रुपयांमध्ये नोंदवता येणार आहेत. ही प्रक्रिया अधिक सोपी, किफायतशीर आणि कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित होणार आहे. शेतकऱ्यांनी आता ही संधीचा लाभ घ्यावा, दस्तांची नोंदणी करून आपल्या जमिनीचा हक्क सुरक्षित करावा, असे आवाहनही सरकारतर्फे करण्यात आले आहे.

## कीटकनाशक फवारतांनाची खबरदारी

शेतीसाठी कीटकनाशके ही खूप महत्त्वाची आणि अविभाज्य घटक आहेत. कोणतेही पीक असले तरी त्या पिकानुसार आणि त्यावर पडणाऱ्या रोगानुसार कीटकनाशके वापरावी लागतात. कीटकनाशक कमी वापरली आणि जास्त वापरली तरीही त्याचे वेगवेगळे परिणाम पिकावर होताना दिसतात. यासोबतच, कीटकनाशके विषारी आणि मौल्यवान असल्यामुळे याचा वापर प्रमाणात होणे गरजेचे आहे. तसेच, जास्त कीटकनाशके वापरल्यानंतर तो शेतीमाल बाजारामध्ये अथवा परदेशांमध्ये विकणेही कठीण होऊन जाते. त्यामुळे कीटकनाशके वापरतांना काही खबरदारी घेणे गरजेचे आहे.

आपल्या शेतामधील पिक आणि त्या पिकावरील पडलेले अथवा संभाव्य रोग यांचा अंदाज घेऊन कोणती कीटकनाशके वापरायची हे प्रथमता ठरवणे गरजेचे आहे. जर, आपल्याला या गोष्टीमधील पूर्ण ज्ञान नसेल तर, स्थानिक तज्ञ अथवा शासकीय कृषी अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन घेणे महत्त्वाचे आहे. कीटकनाशक मारण्याची योग्य वेळ आणि त्याचे प्रमाण समजून घेतले पाहिजे. कीटकनाशकांची शुद्धता दाखवण्यासाठी कीटकनाशकांच्या बाटलीवर हिरव्या निळ्या आणि पिवळ्या किंवा लाल रंगाचे चिन्ह दाखवले जाते. लाल रंगाचे चिन्ह असलेले कीटकनाशक अतिशय विषारी असून, ते सस्तन प्राण्यांवर जास्त नुकसान देतात. हिरव्या रंगाचे कीटकनाशक कमी आणि हानीकारक आहेत.

कीटकनाशक खरेदी करताना त्यावर असलेली उत्पादन तारीख व एक्सपायरी डेट तारीख पाहणे अतिशय गरजेचे आहे. जर मुदत संपलेले औषध- कीटकनाशक आपण पिकांवर मारले तर, त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांवर त्याचा आर्थिक परिणाम होतो. प्रत्येक कीटकनाशकांसोबत ते वापरण्याची आणि हाताळण्याची पद्धती लिहुन आलेली असते. ती काळजीपूर्वक वाचावी. किटकनाशकांची साठवणूक स्वच्छ हवेशीर आणि कोरड्या जागी करावी. कीटकनाशक फवारताना शेतकऱ्याने संपूर्ण अंग झाकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. हातामध्ये रबराचे हातमोजे, तोंडावर मास्क आणि डोळ्याच्या संरक्षणासाठी चष्मा घालणे आवश्यक आहे. फवारणीच्या वेळी जर वारा जास्त असेल तर, फवारणी करणे टाळावे. कीटकनाशके लहान मुलांच्या अथवा पाळीव प्राण्यांच्या संपर्कात येतील असे ठेवू नये.



## जमिनीवरील हक्क सोडायचा आहे? जाणून घ्या सोडपत्राची पूर्ण प्रक्रिया आणि खर्च



जमीन किंवा मालमत्तेवरील आपला हक्क स्वेच्छेने दुसऱ्या व्यक्तीकडे सोपवण्यासाठी जे अधिकृत दस्त तयार केले जाते, त्याला हक्क सोडपत्र म्हणतात. हे सोडपत्र प्रामुख्याने अशा वेळी तयार केले जाते जेव्हा कुटुंबातील कोणीतरी एखाद्या मालमत्तेवरील आपला हिस्सा किंवा वारसाहक्क सोडण्याचा निर्णय घेतो. यामागे अनेक कारणे असू शकतात उदाहरणार्थ, एखादा व्यक्ती शहरात स्थायिक झाला असल्यामुळे गावातील जमीन नको असणे, कौटुंबिक वाद टाळणे, वाटणी झाल्यानंतर हक्क स्पष्ट करणे, किंवा भावंडांमध्ये सहमतीने मालमत्ता विभागून घेणे. अशा सर्व बाबतीत हक्क सोडपत्र महत्त्वाची भूमिका बजावते.


सोडपत्र हे कायदेशीर मान्यता प्राप्त असावे यासाठी ते नोंदणीकृत असणे अत्यावश्यक आहे. नोंदणी झाल्याशिवाय त्याला कोर्टात मान्यता मिळत नाही. सोडपत्र तयार करताना प्रथम त्याचा मसुदा तयार करावा लागतो. या मसुद्यामध्ये हक्क सोडणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव, पत्ता, वय, संबंधित मालमत्तेचा तपशील, हक्काचे स्वरूप, मालमत्तेचा अंदाजे बाजारमूल्य, सोडणीचा हेतू, आणि हक्क स्वीकारणाऱ्या व्यक्तीची माहिती स्पष्टपणे नमूद केलेली असते. हे मसुदा वकील किंवा कायदेशीर सल्लागाराच्या मदतीने तयार करणे शहाणपणाचे ठरते. त्यानंतर, मुद्रांक शुल्क भरण्याची प्रक्रिया येते. महाराष्ट्र स्टँप अधिनियमानुसार, जमिनीच्या हक्काच्या बाजारमूल्यावर आधारित ०.५% ते १% दराने मुद्रांक शुल्क भरावे लागते. उदाहरणार्थ, एखाद्या हक्काचा बाजारमूल्य जर ५ लाख असेल, तर अंदाजे २,५०० पर्यंत मुद्रांक शुल्क लागू शकते. किमान ५०० पासून हे शुल्क सुरू होते. हे शुल्क ऑनलाईन किंवा शासकीय स्टँप विक्रेत्याकडून भरून स्टँप पेपर घेऊन त्या पेपरवर मसुदा छापून घेतला जातो. यानंतर हा दस्त स्थानिक उपनिबंधक कार्यालयात नोंदणीसाठी सादर केला जातो. हक्क सोडणारी व स्वीकारणारी दोन्ही व्यक्ती उपनिबंधक कार्यालयात उपस्थित राहून दस्तावर स्वाक्षरी करतात. यासोबत दोन साक्षीदारांचीही स्वाक्षरी आवश्यक असते. नोंदणी करताना स्वतंत्रपणे नोंदणी शुल्क भरावे लागते, जे साधारणतः १% पर्यंत असते आणि काही जिल्ह्यांमध्ये १,००० पासून सुरू होते.

नोंदणीकृत झाल्यानंतर या दस्ताच्या प्रती दोन्ही पक्षांना मिळतात. सोडपत्र तयार करताना अनेकदा शेतजमिनीबाबत ही प्रक्रिया केली जाते. अनेकदा वाटणी करून घेतलेली जमीन कोणाच्या नावावर चढवायची याबाबत मतभेद असतात. अशा वेळी एक पक्ष आपला हिस्सा सोडतो आणि दुसऱ्याला कायदेशीर हक्क मिळतो. सोडपत्रामुळे पुढे जमिनीची फेरफार नोंद करणे शक्य होते आणि महसूल नोंदीत बदल करून सातबारा उतारा (७/१२) संबंधित व्यक्तीच्या नावावर होतो.

## शेळ्यांना पावसाळ्यात गवतामुळे होणारे आजार

पावसाळा हा शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा काळ असतो, कारण या हंगामात निसर्गाने दिलेली भरपूर पावसाची देणगी जमिनीत नवचैतन्य निर्माण करते. याच काळात शेताच्या बांधांवर आणि मोकळ्या जागांवर भरपूर प्रमाणात ताजं, हिरवं गवत उगवतं. अनेक शेतकरी या नैसर्गिक गवताचा उपयोग आपली शेळ्या, मेंढ्या किंवा इतर जनावरांना चारण्यासाठी करतात. कारण गवत ताजं, रसयुक्त आणि सहज उपलब्ध असतं. मात्र, यामध्ये एक मोठा धोका दडलेला असतो. ताजं गवत खरेच शेळ्यांसाठी पौष्टिक आहे का, की ते त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं? या प्रश्नाचा विचार करून योग्य काळजी घेतली गेली पाहिजे.

ताजं गवत हे पावसाळ्यात जास्त रसयुक्त असतं, त्यात पाण्याचं प्रमाण अधिक असतं आणि ते अपूर्ण वाढलेलंही असू शकतं. हे गवत जर शेळ्यांना थेट व भरपूर प्रमाणात खायला दिलं गेलं, तर त्यांच्या पचनसंस्थेवर याचा विपरित परिणाम होतो. या गवतामुळे पोटात गॅस तयार होतो, पोट फुगतं, अपचन होते आणि काही वेळा श्वास घेण्यात अडचण निर्माण होते. ही स्थिती म्हणजे 'ब्लोट' नावाने ओळखली जाते आणि यामध्ये वेळेवर उपचार न मिळाल्यास शेळीचा जीवही जाऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांनी गवत देताना एकदम भरपूर न देता हळूहळू प्रमाण वाढवावं.



ताज्या गवतामुळे आणखी एक धोका म्हणजे कृमिरोगाचा. पावसाळ्यात जमिनीत ओलावा असल्यामुळे विविध प्रकारचे परजीवी जसे की जंत, गोम, किड्या वगैरे सक्रिय होतात. हे परजीवी गवतासोबत शेळ्यांच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्यांच्या आतड्यांमध्ये जाऊन कृमिरोग निर्माण करतात. यामुळे शेळ्यांचे वजन कमी होणे, डोळ्यांखालचा भाग फिकट पडणे, भूक न लागणे, अशक्तपणा, केस गळणे अशी अनेक लक्षणं दिसतात. या परिस्थितीवर मात करण्यासाठी दर ३ ते ४ महिन्यांनी कृमिनाशक गोळ्या देणे अत्यंत आवश्यक आहे. ताज्या गवतावर बुरशी वाढण्याची शक्यता असते, विशेषतः ते गवत साठवून ठेवले असेल आणि हवामान दमट असेल, तर त्यावर मायकोटॉक्सिन्स तयार होतात. हे बुरशीजन्य विष शरीरात गेल्यास शेळ्यांच्या लिव्हरवर विपरित परिणाम होतो. अन्न पचवण्याची क्रिया मंदावते, विष शरीरात साठतं आणि शेळ्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. काही प्रकरणांमध्ये गर्भवती शेळ्यांमध्ये गर्भपात होण्याचाही धोका असतो.

याशिवाय, ताजं गवत जर प्रमाणाबाहेर दिलं गेलं, तर त्यात जास्त पाण्यामुळे शेळ्यांना जुलाब होऊ शकतो. सततचा जुलाब हा शरीरातील पाणी व क्षारांचं प्रमाण कमी करतो, त्यामुळे शेळ्या निर्जलित होतात, अशक्त पडतात आणि त्यांच्या शरीरवाढीवर परिणाम होतो. हे सर्व टाळण्यासाठी काही काळजी घेणं आवश्यक आहे. प्रथम, ताजं गवत थेट न देता ते थोडावेळ उन्हात वाळवून मग द्यावं. गवतावर बुरशी, काळपटपणा, वास, किंवा चिकटपणा जाणवल्यास ते गवत टाळावं. जनावरांना देण्यापूर्वी गवत नीट पाहूनच वापरावं. चाऱ्यात कोरड्या चाऱ्याचा समावेश करणे गरजेचे आहे जसे की सुकवलेले गवत, डाळींच्या कांड्या, भुसा इत्यादी. ताज्या आणि कोरड्या चाऱ्याचे संतुलन राखल्यास पचनक्रिया सुधारते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : संभाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांकडे गेलेला सिंहगड नवजी बलकवडे यांनी पुन्हा स्वराज्यात आणला.
१८७४ : टंकलेखक (टाईपरायटर) पहिले व्यावसायिक टंकलेखन यंत्र (टाइपराइटर) ची विक्री सुरु झाली.
१८७९ : भारतात पोस्टकार्ड बाजारात विक्रीस उपलब्ध झाली.
१९०९ : क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने भारतमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली यांची इंपिरिअल इन्स्टिट्युटच्या 'जहांगिर हाऊस'मधे इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी गोळ्या झाडून हत्या केली.
१९१९ : कै. बाबूराव ठाकूर यांच्या 'तरुण भारत' (बेळगाव) या वृत्तपत्राची सुरूवात झाली.
१९३३ : नाट्यमन्वंतर संस्थेच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३४ : मानवी शरीराचे सर्वप्रथम छायाचित्र घेण्यात अमेरिकन डॉक्टरांना यश
१९४८ : बाजारपेठेतील व्यापार्यांचे नेतृत्त्व करणार्या 'पूना मर्चंट्स चेंबर' या संस्थेची स्थापना
१९४८ : 'कायदेआझम' मुहम्मद अली जीना यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' या पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेचे उद्घाटन झाले.
१९४९ : त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थाने एकत्र करुन 'थिरुकोची' संस्थान निर्माण करण्यात आले. याचेच पुढे केरळ राज्य बनले.
१९५५ : 'स्टेट बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९५५' अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्त्वात आली. याआधी ही बँक इंपिरिअल बँक या नावाने ओळखली जात होती.
१९६० : रवांडा व बुरुंडी हे देश स्वतंत्र झाले.
१९६१ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार पुणे विद्यापीठाचे चौथे कुलगुरू झाले.
१९६२: सोमालिया व घाना हे देश स्वतंत्र झाले.
१९६४ : न. वि. गाडगीळ पुणे विद्यापीठाचे पाचवे कुलगुरू झाले.
१९६४ : भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली.
१९९७ : शतकातील सर्वोत्कृष्ट वेटलिफ्टर्सच्या यादीत भारताच्या कुंजरानी देवीचा समावेश करण्यात आला.
२००२ : आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालय स्थापना झाली.
२०१५ : डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.
२०१७ : देशांतील अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा म्हणून वस्तू व सेवाकर (जीएसटी) संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४६ : प्रख्यात जर्मन गणितज्ञ व तर्कशास्त्र विद्वान गाटफ्रीड विलहेल्म लाइबनिज( ) यांचा जन्मदिन.
१८८२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (मृत्यू: १ जुलै १९६२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८७ : कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (मृत्यू: ? ? १९२०)
१९१३ : वसंतराव जाईक महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९७९)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील महान बासुरी वादक, संगीत दिग्दर्शक आणि थोर शास्त्रीय कलाकार पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा जन्मदिन.
१९४९ : वेंकय्या नायडू केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, भारताचे वे१३ उपराष्ट्रपती
१९६१ : कल्पना चावला भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (मृत्यू: १ फेब्रुवारी २००३)
१९६६ : उस्ताद राशिद खान रामपूर-साहसवान घराण्याचे शास्त्रीय गायक
१९६८ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत परंपरेतील रामपूर-साहसवान घराण्यातील शास्त्रीय संगीतकार उस्ताद रशीद खान यांचा जन्मदिन.
१९७३ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व समाजवादी पक्षाचे अध्यक्ष तसचं, उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री अखिलेश कुमार यादव यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (जन्म: २९ डिसेंबर १८००)
१९३८ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्हाडचे नबाब' (जन्म: २७ ऑगस्ट १८५४)
१९४१ : सर सी. वाय. चिंतामणी स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (जन्म: १० एप्रिल १८८० विजयनगरम, आंध्र प्रदेश)
१९६२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष (जन्म: १ ऑगस्ट १८८२)
१९६२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (जन्म: १ जुलै १८८२ पाटणा, बिहार)
१९६९ : मुरलीधरबुवा निजामपूरकर कीर्तनकार
१९७१ : सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग (ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता, )
१९८९ : प्राचार्य ग. ह. पाटील कवी व शिक्षणतज्ज्ञ, 'माझ्या मामाची रंगीत गाडी हो', 'देवा तुझे किती, सुंदर आकाश', 'डराव डराव, डराव डराव, का ओरडता उगाच राव' अशी त्यांची अनेक बालगीते लोकप्रिय आहेत. (जन्म:)
१९९४ : राजाभाऊ नातू दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक व नाट्य संघटक (जन्म:)
१९९९ : एम अँड एम चे संस्थापक फॉरेस्ट मार्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १९०४)

# नगरपरिषद कार्यालयासमोर सय्यद सलीमबापुच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको

## आंदोलकांनी विविध मागण्या लावून धरत मुख्याधिकाऱ्यांना आणले ताळ्यावर

माजलगाव। प्रतिनिधी

शहरातील नागरी समस्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांसह विविध मागण्या लावून धरत आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीमबापू यांनी सोमवार दि.३० रोजी सकाळी नगरपरिषद कार्यालय समोर रास्ता रोको केला.यावेळी आंबेडकरी विचार मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या कामकाजाविषयी निषेधाच्या घोषणा करत मुख्याधिकाऱ्यांना ताळ्यावर आणले. माजलगाव नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरू आहे.




जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत.परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे.या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला. संघटनेच्या वतीने वतीने सोमवार दि.३० जुन २०२५ रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको केला. यावेळी कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कामाचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी केली. शहरातील नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार,भोगवटदार,बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात यावे.आलेले नाही. याला मंजुरी देण्यात यावी.आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे,तो पूर्ण करण्यात यावा.सन २०२० ते २०२५ या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी.किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.शहरात किती ओपनस्पेस,डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी.इत्यादी मागण्या यावेळी कार्यकर्त्यांनी लावून धरल्या.सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचारू मोर्चाच्या वतीने केलेल्या भव्य रास्ता रोकोने धास्तावलेले पालिका प्रशासन ताळ्यावर आले. दरम्यान प्रशासनाच्या वतीने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे अभिवचन आंदोलकांना दिले.या आंदोलनात आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू,एडवोकेट सय्यद अल्ताफ,यांच्यासह संघटनेचे शेकडो पदाधिकारी सहभागी होते.

# डबड्या मेंदूच्या लोणीकरांवर कारवाई करा - गणेश बजगुडे

## बबनराव लोणीकर यांचा बीड तालुका काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध

बीड। प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे नेते परतुर विधानसभा मतदार संघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी जगाचा पोशिंदा असलेला बळीराजा व महिला भगिनीबद्दल अतिशय क्लेशदायक वक्तव्य करून आपल्या डबड्या झालेल्या मेंदूतील लोणीपाजरन्याचे काम केले असुन या वक्तव्याचा गणेश बजगुडे पाटील यांनी बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांतीच्या वतीने तीव्र निषेध केला.



ज्या मायबाप जनतेने लोणीकर यांना विधानसभेत पाठवले त्यांच्यावर अतिशय खालच्या पातळीचे वक्तव्य करत शेतकऱ्यांच्या अंगावरचे कपडे, चप्पल, बुट व तो डबडा मोबाईल हे सर्व मोदी सरकरणे शेतकऱ्यांना वर्षाला दिलेले सहा हजार व लाडक्या बहिणीच्या पैशातून येते असे अतिशय चुकीचे विधान केलेले असून या वक्तव्याचा निषेध व्यक्त करत काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, निवडणुकीच्या काळात शेतकरी कर्ज माफी करु म्हणणारे भारतीय जनता पक्ष ज्या शेतकऱ्यांच्या व माय माऊलीच्या आशीर्वादाने सत्तेत आले आज ते शेतकऱ्यांना भिकाऱ्याची उपमा देत आहेत. सरकार हे जनतेने निवडून दिलेले असताना व लोकशाहीत जनताच मायबाप असते परंतु भाजपच्या नेत्यांना सरकार म्हणजे खाजगी मालमत्ता वाटत असेल तर येणाऱ्या काळात मायबाप जनता त्यांना धडा शिकवेल परंतु लोणीकर यांना सांगणे आहे की, माझ्या बापाचा मोबाईल डबडा नाहीतर तुमचा मेंदू डबडा झालेला आहे. तुमच्या अंगावरील कपडे, गाडी, चप्पल बुट सर्व त्याच शेतकऱ्यांच्या आशीर्वादाने मिळालेले आहे. बळीराजाच्या मालाला योग्य हमीभाव द्या, निवडणुकीत संपुर्ण कर्जमाफीच्या केलेल्या मोठ मोठ्या वल्गना यावर कधी तरी बोलावं शेतकरी मोठ्या मनाचा बाप माणूस आहे तो तुमच्या डबड्या योजनेला कधीही भिक घालत नसुन लोणी करांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसचे गणेश बजगुडे यांनी केले आहे.

# बीड नगरपरिषदे च्या विरोधात मनसेचे अनोखे आंदोलन !

## खड्ड्यात बेशरम चे झाड लावून घोषणाबाजी



बीड ।प्रतिनिधी

शहरातील जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक,कारंजा रोड,राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने बीड नगरपरिषद च्या विरोधात जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून अनोखे आंदोलन करण्यात आले. असे की,बीड शहराच्या मध्ये भागातून जाणाऱ्या शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा जुना बाजार कोतवाली वेस ते बलभीम चौक,कारंजा रोड राजुरी वेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पऱ्यांत रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठ - मोठाले खड्डे पडून सामान्य नागरिकांना रहदारीसाठी मोठा अडथळा येत आहे.शहरातील हा प्रमुख व्यापारी मार्ग असून दररोज या ठिकाणी जिल्हाभरातून नागरिक विविध व्यवसायाच्या निमित्ताने येतात तसेच

अनेक दिवसापासून रस्त्याच्या कामाला प्रलंबित ठेवलेला असल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बीड नगर परिषदेने येथील नागरिकांची पिळवणूक थांबून तात्काळ रस्त्याचा काम सुरू करावा अशी मागणी करत आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वार्षताई जगदाळे (महिला आघाडी राज्य उपाध्यक्ष) यांच्या प्रमुख उपस्थितीत मनसे बीड शहराध्यक्ष पठाण अमरजान यांच्या नेतृत्वाखाली जुना बाजार येथील रस्त्यावरील खड्ड्यात बेशरम चे झाड लावून बीड नगरपरिषदेच्या विरोधात तीव्र व जोरदार घोषणाबाजी करत अनोखे आंदोलन करण्यात आले.यावेळी मनसेचे सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष) आशा कुटे (बीड जिल्हाध्यक्ष),कल्पना कवठेकर (जिल्हा उपाध्यक्ष), सुरेखा ढाकणे,स्वराज मस्के,मोहम्मद सलीम,अब्दुल अजीम,तारेख चाऊस,रफिक शेख,मोमीन खादीर सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होतेआदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाला भरदुपारी कुलूप:अधिकाऱ्यांची बेपर्वाई उघड

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोमवारी नागरिक कामानिमित्त कार्यालय गेले मात्र अधिकाऱ्याच्या ऑफिसला कुलूप. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सरकारी कार्यालय बंद असणे म्हणजे प्रशासनाच्या बेशिस्त कारभाराचे जिवंत उदाहरण आहे.याला जवाबदार कोण?




या विभागाचे प्रमुख अधिकारी हे आपल्या जबाबदाऱ्या पूर्णपणे सोडून बेपर्वा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. कार्यालय वेळेत उघडण्याऐवजी, संपूर्ण बंद ठेवणे ही केवळ शिस्तभंग नव्हे, तर नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणणारी कृती आहे. ''सरकारी कामांमध्ये आधीच प्रचंड विलंब होतो, त्यात हे असं ऑफिसलाच कुलूप? मग आम्ही गाठायचं कोणाला?'' असे प्रश्न संतप्त नागरिक विचारत होते. काहींनी तर थेट व्हिडीओ काढून सोशल मीडियावर व्हायरल करत अधिकाऱ्यांच्या निष्काळजी कारभाराचा पर्दाफाश केला. आता अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित निलंबनाची मागणी नागरिकांकडून होत आहे. पाटोदा सारख्या ग्रामीण भागात नागरिकांना वेळेवर काम न झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम होतात, हे प्रशासनाने लक्षात घेतले पाहिजे. अधिकारी दाखवा आणि बक्षीस मिळवा प्रशासनावर जनतेचा दबाव अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवर बक्षीस जाहीर करण्याची योजना प्रशासनाने राबवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अशा हलगर्जी अधिकाऱ्यांना अद्दल घडवण्यासाठी कठोर पावले उचलली जाणे गरजेचे आहे. जर अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नसतील, कार्यालय कुलूपबंद ठेवले जात असेल, तर सामान्य जनतेचा सरकारवरील विश्वास उडेल. हे रोखायचे असेल, तर अशा बेफिकीर अधिकाऱ्यांना कडक शासन हवेच!

# शाळकरी मुलींना सायकल वाटप



माजलगाव। प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या भाटवडगाव येथे समाजासाठी काहीतरी चांगलं करून वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श भाटवडगावात पाहायला मिळाला. येथील माजी सरपंच गीताराम अनभुले यांनी आपल्या ४३ व्या वाढदिवसानिमित्त एक आगळा वेगळा उपक्रम राबवून गावकऱ्यांचे मन जिंकले. गावातील शाळकरी मुलींना सायकल वाटप करून त्यांचा शिक्षणप्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित व्हावा, यासाठी या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

भाटवडगाव गावा पासून शाळेचं अंतर सुमारे १ किलोमीटर असून,मुलींना दररोज शाळेत जाण्यासाठी पायी चालावं लागतं.ही अडचण लक्षात घेऊन,सामाजिक जाणिवेतून प्रेरित होऊन हा उपक्रम हाती घेण्यात आला.या सायकल वाटप कार्यक्रमात गावातील वडीलधारी मंडळी, महिलावर्ग, शिक्षक आणि तरुण मित्रपरिवार उपस्थित होता.या कार्यक्रमाचं आयोजन विद्यमान सरपंच किशोर फुलसरे यांनी केलं होतं.

# मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे अपुरे राहिलेले काम पूर्ण करा–ॲड.नरसिंह जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

शासनाचे ३ कोटी रु उचलून मांजरा नदीवरील पुलकम बंधाऱ्याचे काम अजूनही अपुरेच आहे. पाटोदा शहरातील नागरिकांना सदरील पूलाचे काम लवकरात लवकर पुर्ण करून वापर करण्यासाठी उपलब्ध करून देणे बाबत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजित दादा पवार साहेब, सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त, छ. संभाजीनगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्य अधिकारी, नगर पंचायत पाटोदा यांना निवेदन दिले आहे.

पाटोदा येथाल मांजरा नदीवर पूल कम बंधारा याचे तीन कोटी रुपयांचे बजेट मंजूर होऊन सदरील काम नगरपंचायत पाटोदा यांच्यामार्फत करण्यात आले होते. परंतु संबंधित ठेकेदार यांनी संपूर्ण तीन कोटी रुपये उचलून पुलाचे अर्धवट बांधकाम केले आहे. सदरील प्रकरणांमध्ये तांत्रिक मान्यता बोगस केल्यामुळे मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे जनहीत याचिका क्र. ०३/२०२२ दाखल झाली होती. यामध्ये न्यायालयाच्या आदेशाने नगरपंचायत मुख्य अधिकारी व इतर कर्मचाऱ्यासहित संबंधित ठेकेदार यांच्यावर पाटोदा पोलिस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा क्र.२१२/२०२२ दाखल होऊन पाटोदा प्रथम वर्ग दंडधिकारी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झालेले आहे, पाटोदा शहरातील नागरिकांसाठी जो पूल कम बांधरा होणार होता तो न झाल्यामुळे संबंधित भागातील शेतकरी व नागरिक यांना येण्या जाण्यासाठी खूप त्रास होत आहे. तसेच शासनाने संबंधित कामावर तीन कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सदरील पैसा हा जनतेचा पैसा आहे त्याचा अपव्यय झालेला आहे. परंतु उर्वरित काम होण्यासाठी यापूर्वी नगरपंचायत च्या वतीने ६५ लक्ष रुपयाची अतिरिक्त मागणी करण्यात आली होती. तेव्हा उर्वरित काम होण्यासाठी ६५ लक्ष किंवा सध्याच्या मार्केट प्रमाणे जो काही खर्च येणार आहे, तो शासनाने त्वरित उपलब्ध करून द्यावा व सदरील काम सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करावे व जनतेला सदरील पूल कम बंधारा तयार करून जनतेच्या वापरासाठी खुला करून द्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

# मुख्याध्यापक सुधाकर सावंत यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

## मान्यवरांकडून सावंत सरांच्या कार्यावर स्तुती सुमने

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील फुलसांगवी येथील जि. प. माध्यमिक शाळेचे मुख्यध्यापक सुधाकर पांडुरंग सावंत यांची सोमवार दि.३० जून रोजी सेवापूर्ती संपन्न झाली असून शाळेच्या, व ग्रामपंचायतच्या वतीने आज निरोप समारंभाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना सावंत सरांच्या कार्यावरती स्तुती सुमने उधळून मनोगत सरांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तर विद्यार्थिनी ही सावंत सर्वांना निरोप देताना मोठे भावनिक झाल्याचे पाहायला मिळाले.




शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील जिल्हा परिषद केंद्र माध्यमिक शाळेवरती आठ वर्षांपूर्वी सुधाकर पांडुरंग सावंत हे मुख्याध्यापक पदी रुजू झाले. अल्प कालावधीतच अगदी मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी सर्वांना आपलंसं करून घेतलं. विद्यार्थ्यासोबतही आपली आपुलकीची नाळ जुळवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला सर्वतोपरी झोकून दिल होत त्यामुळे सावंत सर हे सर्वांचे प्रिय झाले होते. आज त्यांचा सेवापूर्तीचा निरोप समारंभ सोहळा शाळेच्या व ग्रामपंचायतच्या वतीने भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शिरूरचे शिक्षण विस्तार अधिकारी जमीर शेख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी केकान साहेब ( न्यायाधीश श्रीगोंदा ) मधुकर सावंत( माजी अप्पर पोलीस अधीक्षक पुणे ) अशोकराव पाटील (शिक्षणाधिकारी पालघर ) तर प्रमुख उपस्थिती सरपंच भास्कर सानप, एमबी सानप, श्रीमती प्रणिता गंगाखेडकर मॅडम ( विस्तार अधिकारी ), विष्णुपंत मिसाळ, मधुकर मोराळे ( गटशिक्षणाधिकारी बीड ) पंडित गोपाळघरे ( गटशिक्षण अधिकारी गेवराई ) सौ आशाबाई अंकुश गर्जे( अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती ) सखाराम तळेकर, आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार सर यांनी केले तर प्रस्ताविक डोंगरे सर यांनी केले होते. सावंतसरांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये कु. भक्ती जायभाये या विद्यार्थिनीने या कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी संगीतमय गीत गायनाचा कार्यक्रम केला केला. भक्तीच्या या सुरेल गायनाने आलेल्या मान्यवरांसह सर्व उपस्थित नागरिक ही मोठे भारावून गेले होते.

**सावंत माझ्या जीवनातला पहिला आदर्श मुख्याध्यापक– जमीर शेख**

कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलताना शिक्षण अधिकारी जमीर शेख म्हणाले की, सावंत सर हे मुख्याध्यापक असून प्रशासकीय कामकाजामध्ये दुर्लक्ष करतात असं मला सातत्याने वाटायचं, मिटींगला त्यांची गैरहजेरी असायची, पत्रव्यवहारालाही त्यांचे उत्तर नसायचे यामुळे सुरुवातीच्या काळात माझे आणि सावंत सरांचे जमत नसायचे मात्र पुढे चालून त्यांच्याबद्दल जाणून घेत गेल्यानंतर असे लक्षात आले की त्यांचा विद्यार्थ्यांच्या आणि शाळेच्या विकासाबद्दल सातत्यपूर्ण ध्यास असायचा यामुळे त्यांना मुख्याध्यापक असूनही विद्यार्थ्यांना शिकवणी देण्यामध्ये जास्त रस असायचा त्यातच ते स्वतःला व्यस्त करून घेत असत. यामुळे मला त्यांच्याबद्दल प्रेम वाढत गेलं आज मी तिला मी त्यांच्याबद्दल बोलायचे झाले तर सावंत सर माझ्या जीवनातला पहिला आदर्श मुख्याध्यापक आहे असे मला म्हणावे लागेल असे त्यांनी शिक्षण अधिकारी जमीर शेख यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या भाषणातून सर्वांसमोर आपले मत मांडले.

# किल्लेधारूर मुख्य रस्त्याचे काम थातूरमातूरच सुरु

## न उकरता उर्वरित रस्त्यासाठी मातीमिश्रीत कपचीचा वापर



धारूर ।प्रतिनिधी

किल्लेधारूर शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्याचे काम व्यापारी बांधव, व नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणी नंतर सूरू करण्यात आले. हे काम छत्रपती शिवाजी महाराज चौक, काशिनाथ चौक व हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सुरू आहे कामाचे एकूण बजेट १४ कोटी रुपयाचे असताना काम मात्र अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहे. आहे त्या रस्त्यावर थातूर मातूर टोकरून माती मिश्रित कपचीचे ढिगारे टाकुन पांगवले जात आहेत. त्यावरच खडी टाकून बेड बनवुन दबयी केली जात असून नालीची निघालेली मातीसुध्दा बाजूला काढण्याचा त्रास गुत्तेदार घेत नसुन त्यावरच रस्त्याचे काम सुरुआहे. ऐरवी साधे काम जरी शहरात चालू असले की त्रुटी दिसताच अश्या कामा विरूध्द आवाज उठवणारे पत्रकार, समाजसेवक, लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प कसे आहेत हा प्रश्न नागरिक नागरिकांमध्येच चर्चा करून येत असताना ठिकठिकाणी दिसत आहेत. नगर पालिकेचे मुख्याधिकारी, बांधकाम विभाग अधिकारी व गुत्तेदाराचे अर्थपूर्ण साटेलोटे असल्याचे बोलले जात आहे. या बोगस कामाची जिल्हाधिकारी साहेबांनी तत्काळ दखल घेऊन भ्रष्टाचार मोडीत आणावा अशी मागणी किल्लेधारूर मधील नागरिक करत आहेत.

# सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सुरू केलेले वस्तीगृह गरजेचे होते-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**सध्याची परिस्थिती पाहता मुलींना शिक्षण घेत असताना समृद्ध वारसा जपत संस्काराची शिदोरी देखील महत्त्वाची राहिली आहे. आपल्या मुलाची सुरक्षितता असावी अशी अपेक्षा पालकांची असतेच त्याचबरोबर व्यावसायिक उपक्रम म्हणून नव्हे तर सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून मुलींसाठी सुरक्षित वस्तीगृह आवश्यक होते असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**

बीड येथील शाहूनगर भागात प्रा.उमाकांत जगताप यांनी व्यंकटेश गर्ल हॉस्टेल उभारणी केली आहे. या हॉस्टेलचा शुभारंभ माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ह.भ.प.माऊली महाराज जगताप, प्रा.श्रीराम चौभारे, डॉ.चैतन्य कागदे, डॉ.आत्माराम गंगणे, डॉ.प्रशांत गायकवाड, जयंत जाधव, डॉ.तुकाराम



बडे, अशोक पवार, डॉ.मंचक जाधव, पंजाबराव मस्के, ॲड.शहाजीराव जगताप, दिलीप घुमरे, प्रा.सत्येंद्र पाटील, प्रा नामदेव चांगण, प्रा.पी.आर.बोबडे, बबनराव उडाण आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बाहेरगावी शिक्षण घेणार्या मुलींना सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी पालकांचा आग्रह असतो. प्रत्येक पालक हा आपल्या पाल्याची सुरक्षितता बघतो या ठिकाणी सुरक्षिततेबरोबर सामाजिक सुरक्षितता ही किती महत्त्वाची आहे हे महत्त्वाचे असते. या ठिकाणी व्यावसायिक उपक्रम म्हणून नव्हे तर सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून मुलींसाठी सुरक्षित वस्तीगृह उभारले असले तरी हे एक आव्हानच आहे. मानसिक आणि भावनिक जडणघडण भौतिक सुविधा सामाजिक सुरक्षा संरक्षण आरोग्य अशा अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. अद्यावत वस्तीगृह असणे गरजेचे होते. मुलींना शिक्षण घेताना स्वतःची सुरक्षितता मिळावी तसेच सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात असा आग्रह असतो. सध्या स्त्री आणि पुरुष असा भेदभाव राहिला नसून समानतेच्या आधारावर सध्या प्रत्येक क्षेत्रात शिक्षण सुरू आहे. आपल्या संस्काराची प्रथा प्रत्येकाला समजावी आपला समृद्ध वारसा जपला पाहिजे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. सध्या माणुसकीला काळीमा फासणार्या घटना घडत असून त्यामुळे प्रत्येक गोष्टीची काळजी घेऊन सामाजिक कार्याचा गाडा पुढे न्यायला हवा असे ते म्हणाले, यावेळी मोहनराव सोळूंके, अनंत पिंपळे, सुरज घुमरे, डॉ.हनुमंत जगताप, ज्ञानेश्वर जगताप यांच्यासह सर्वच क्षेत्रातील मान्यवर, महिला-पुरूषांची उपस्थिती होती.

# गोर गरिबांच्या लेकरांसाठी संघर्ष करणारे मेटेसाहेब- राजेंद्र आमटे

## खांडे पारगाव येथे मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

बीड । प्रतिनिधी

सर्व सामान्य घरातून संघर्ष करत महाराष्ट्राच्या पटलावर बीड जिल्ह्याच नाव कोरणारे बहुजन नायक लोकनेते विनायकराव मेटे यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य गोर गरिबांच्या लेकरासाठी विविध प्रश्नांवर संघर्ष केला असे गौरव उद्गार शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी काढले.

बीड तालुक्यातील खांडे पारगाव येथे माजी आ. विनायक मेटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात राजेंद्र आमटे बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकरी कर्ज माफी साठी सर्वात मोठा मोर्चा शेगाव येथे मेटे यांनी काढला. शेतकरी शेतमजूर पेन्शन योजना राबवण्यात यावी हि मुख्य भूमिका मेटे यांनी घेतली. मराठा



समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सर्वात मोठ्या लढा दिला. सारथी संस्थेच्या स्थापनेत सिंहाचा वाटा उचलला, खुल्या प्रवर्गातील नोकर भरती वय मर्यादा वाढवायचं काम मेटे यांनी केले. सर्व सामान्य घरातून संघर्ष करून गोर गरिबांच्या लेकरासाठी आयुष्य वेचणारे एकमेव नेते होते, असे प्रतिपादन राजेंद्र आमटे यांनी केले.

खांडे पारगाव येथे लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या वेळी शिवसंग्राम शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, हरिभाऊ आमटे, आत्माराम आमटे, महादेव आमटे, नवनाथ बापू, अनिल पाटील, सुनील आमटे, बाबासाहेब सुरवसे, बापुराव सपकाळ, लहू आमटे, संतोष आमटे, नवनाथ सोळुंके, ऋषिकेश आमटे, विष्णू वाघमारे, सुदाम ठोकळ सह आदी उपस्थित होते.

# पेट्रोलपंप चालकाच्या धाडसामुळे डिझेल चोरी करणारी टोळी जेरबंद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहारालगत असलेल्या चतुरवाडी शिवारातील पेट्रोलपंप व्यवसायिक राहुल विजयकुमार कोपले यांच्या सतर्कतेमुळे डिझेल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत बनावट पिस्टल, डिझेलने भरलेले कॅन, तीन मोबाईल फोन्स, स्कॉर्पिओ गाडी यासह ३ लाख ८७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

२८ जून रोजी पहाटे तीनच्या सुमारास राहुल कोपले हे घराकडे जाताना पेट्रोलपंपाकडे गेले. यावेळी ट्रक क्रमांक २७ ८८८५ च्या डिझेल टाकीमध्ये पाईप टाकून डिझेल चोरी केली



**बनावट पिस्टलसह स्कॉर्पिओ गाडी जप्त**

जात असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. त्याठिकाणी तीन संशयित व्यक्ती आढळले. यातील दोन जण ट्रकजवळ होते आणि तिसरा इसम ०२ ४३६९ क्रमांकाच्या स्कॉर्पिओ गाडीत बसलेला होता. कोपले यांना पाहताच त्यांनी पल काढला. कोपले यांनी तत्काळ या गाडीचा पाठलाग सुरू केला आणि पोलिसांनाही माहिती दिली. त्यांनी चुलत भाऊ अरविंद व चंद्रकांत कोपले यांना देखील मदतीसाठी बोलावले. लोखंडी सावरगावजवळ कोपले यांनी चोरट्यांची स्कॉर्पिओ गाडी अडवली आणि त्यांना पेट्रोलपंपाजवळ येण्यास भाग पाडले.

यावेळी चोरट्यांपैकी दोन जण खाली उतरले आणि त्यांनी चोरी केलेले डिझेल परत देण्याची तयारी दर्शवली. मात्र, अचानक एका आरोपीने बनावट पिस्टल दाखवत कोपले यांना धमकावले आणि पळून गेला. त्यावेळी त्याच्या हातातील पिस्टल खाली पडली. त्याच्यासोबत दुसरा आरोपीही पसार झाला. तेवढ्यात पेट्रोलपंपावरील कामगार व ट्रकमधील ड्रायव्हर घटनास्थळी पोहोचले.

◀◀ पान ३ वर

# स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून लोक शिक्षण, लोकजागृतीसाठी प्रयत्न करणार

## नवीन संघटनेची स्थापना -अध्यक्ष ॲड. अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

''स्वराज्य जनजागृती परिषद'' या नवीन संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून आता कानाकोपऱ्यात लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. लोकशिक्षण आणि लोकजागृती हा संघटनेचा मूळ गाभा असून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि आवाज उठवण्यासाठी संस्था काम करेल. व्यक्तीला नव्हे तर व्यवस्थेला विरोध हे गेल्या तीस वर्षापासूनचे धोरण कायम असणार आहे, असे स्वराज्य जनजागृती परिषदेचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.



ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन ही चळवळ बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवरील सर्व शाखा बरखास्त करण्यात आल्या. मात्र आजही विश्वस्त म्हणून ॲड. अजित देशमुख व इतर या जन आंदोलनात अण्णांसह आहेत. गेल्या वीस - पंचवीस वर्षांपासून जन आंदोलनाच्या माध्यमातून हजारो कार्यकर्ते जोडले गेलेले आहेत. या कार्यकर्त्यांच्या मागणीवरून हे संघटन स्थापन करण्यात आले आहे. नवीन संघटन स्थापन झाल्यानंतर त्या संघटनेला कार्यकर्त्यांची वानवा असते. मात्र स्वराज्य जनजागृती परिषद स्थापन होण्यापूर्वीपासूनच हजारो कार्यकर्ते जोडले गेले आहेत. त्यामुळे परिषदेचे काम मोठ्या प्रमाणात होणार आहे. स्वराज्य जन आंदोलन परिषदेचे अध्यक्ष म्हणून ॲड. अजित एम, देशमुख (बीड), उपाध्यक्ष म्हणून संदीप विठ्ठल जगताप (सातारा), सचिव तुषार अच्युतराव पाटील (कुर्ला), सहसचिव अरुण मोहन बोबडे (धाराशिव), कोषाध्यक्ष शिवाजी बबन खेडकर (पुणे), तर सदस्य म्हणून विष्णू भगवान ढवळे (छत्रपती संभाजीनगर) आणि गोवर्धन विठ्ठलराव मस्के (बीड) हे या संघटनेत विश्वस्त म्हणून कामकाज पाहणार आहेत.

संघटनेची पायाभरणी करताना अनेक विभागातून विश्वस्त घेण्यात आले आहेत. हे सर्व विश्वस्त त्या त्या भागात प्रभावशाली रीतीने काम

◀◀ पान ३ वर

# खा.सुप्रीयाताई सुळे यांचा जन्मदिन सामाजिक उपक्रमाने साजरा

## परळी उपजिल्हा रुग्णालयात रूग्णांना फळांचे वाटप; अनेक ठिकाणी वृक्षारोपण

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

लोकसभेतील संसदरत्न खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सौ.सुप्रियाताई सुळे यांचा सोमवारी जन्मदिवस असल्याने परळी वैजनाथ येथे अनेक सामाजिक उपक्रम घेण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले तर शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.



परळी वैजनाथ येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा, संसदरत्न खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांचा जन्मदिवस सामाजिक उपक्रमांनी

◀◀ पान ३ वर

# घाटनांदुर येथे अकरा वर्षीय मुलीचा विहिरीत बुडून मृत्यू

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील (महादेव पट्टी) जवळ झोपडीत राहणाऱ्या रेणुका राजू गुंजाळकर (वय ११) रा सावरगावमुंडे ता लोणार जि बुलढाणा येथील असून रेणुका तिच्या आत्याकडे घाटनांदुर या ठिकाणी राहत होती रेणुकाची आत्या पोटाची खळगी भरण्यासाठी घाटनांदुर येथे दगड फोडून मजुरी करत होती रेणुका ३० जून रोजी सोमवारी सकाळी १२च्या सुमारास विहिरीत पाणी आणण्यासाठी गेली असता विहिरीत पाय घसरून बुडाल्याने नातेवाईकांनी आरडा-ओरडा केला असता नातेवाईकांनी विहिरीतून काढून अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात नेले असता रेणुकास डॉक्टरांनी मृत घोषित केले या मृत्यूची अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे या घटनेचा पुढील तपास ए.एस.आय बाळकृष्ण मुंडे करत आहेत या दुर्दैवी घटनेमुळे घाटनांदुर व परिसरातील नागरिकांतून हळहळ व्यक्त होत आहे.

# सार्वजनिक बांधकाम उपविभागातील ३० वर्षाच्या सेवेनंतर अनिल कदम सेवानिवृत्त



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात कार्यरत असलेले वरीष्ठ सहाय्यक अनिल कदम यांनी ३० वर्ष इतर कर्मचाऱ्यांना व कार्यालयात येणाऱ्या सर्व नागरिकांना सहकार्याची भावना ठेवत अत्यंत प्रामाणिकपणे आपले काम केले असे प्रतिपादन उप अभियंता के एल पानसबंळ यांनी केले.**

आष्टीतील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयातील वरिष्ठ सहाय्यक अनिल कदम हे सोमवार दि ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले त्यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रम प्रसंगी अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी एस बी सिरसाट,बीड येथील सारडा,एस बी हजारे,पी एस मुळे,बी बी गाडे,व्हि बी गाडे,पी बी काळे,एन बी वारंगुळे,एस यू वाल्हेकर आदी कर्मचारी उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्गावरून मराठवाड्यात उसळला संताप कृषीदिनी अंबाजोगाई तालुक्यात रास्तारोको आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा मुद्दा असलेल्या जमिनीवर केंद्र व राज्य सरकारने संपूर्ण मराठवाड्यात शक्तिपीठ महामार्गाच्या नावाखाली जबरदस्तीने सीमांकन व संपादन सुरू केले असून, या भूमीहक्काच्या लढ्यात शेतकरी आता निर्णायक पावले उचलत आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांनी या महामार्गाविरोधात एक जुलै कृषिदिन रोजी भव्य रास्तारोको आंदोलन छेडण्याचा निर्धार केला आहे.

पवणार ते पत्रादेवी या प्रस्तावित महामार्गासाठी राज्यातील १२ जिल्ह्यांतील २७ हजार एकरहून अधिक शेती जमिनीचे संपादन होणार असून,



हजारो कुटुंबे उद्?ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. बीड जिल्ह्यातील परळी आणि अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये या निर्णयाविरोधात प्रचंड असंतोष निर्माण झाला असून, वरवटी, धायगुडा, पिंपळा, गीत्ता, भारज, नांदगाव, सायगाव यांसारख्या गावांतील शेतकरी रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत.

अनेक ठिकाणी शासनाने पोलिसी बळाचा वापर करत, खोटी आश्वासने देत आणि दबाव तंत्र वापरून सीमांकन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, शेतकऱ्यांनी आता अशा कारवायांचा तीव्र विरोध करत शक्तिपीठ महामार्ग रद्द झाला पाहिजे, या मागणीसाठी एकवटण्याचा निर्णय घेतला आहे. भारज व नांदगाव येथे झालेल्या बैठकीत एड. अजय बुरांडे, गजेंद्र येळकर, मोहन गुंड, सुशील शिंदे, मारुती इर्लापल्ले, विनायक ढाकणे, जयकिसान मेटे, रामेश्वर चव्हाण यांसह असंख्य शेतकरी उपस्थित होते. या बैठकीत ''भूमी आमची हक्क आमचा, शक्तीपीठ नकोच आम्हाला'' अशा घोषणांनी परिसर दणाणला. शक्तीपीठ महामार्गामुळे सिंचन सुविधा मिळतील असे राज्याचे मुख्यमंत्री म्हणत असले, तरी समृद्धी महामार्गाच्या विनाशकारी परिणामांचे ताजे उदाहरण महाराष्ट्राच्या जनतेसमोर ताजे आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून झालेले नुकसान हे शासनाच्या नियोजनशून्यतेचे

◀◀ पान ३ वर

# पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ९ जुलै पासून आझाद मैदान, मुंबई येथे होणाऱ्या बेमुदत उपोषण आंदोलनात सहभागी व्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ९ जुलै पासून आझाद मैदान, मुंबई येथे होणाऱ्या बेमुदत उपोषण आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष मुकुंद तुरे यांनी केले आहे.



मुकुंद तुरे
(राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटना.)

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे जिल्हा परिषदेच्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा विविध प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी मागील एक वर्षांपासून भाऊसाहेब पठाण (अध्यक्ष, राज्य सरकारी गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, मुंबई.) यांच्या नेतृत्वात निवेदनाद्वारे पाठपुरावा सुरू आहे, ग्रामविकास विभागाने दि.१३ जून २०२४ रोजी निर्गमित केलेले आरोग्य सेवकपदाचे सेवाप्रवेश नियमाचे प्रारूपामध्ये जिल्हा परिषदेमधील पूर्वीपासुन सेवेत असलेल्या माध्यमिक शालांत परिक्षा(१० वी) उत्तीर्ण गट-ड कर्मचा-यांना आरेग्य सेवक पदावर २५ टक्के पदे ही पदोन्नतीसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. तथापि, सदर सेवाप्रवेश नियमांचे प्रारूपास गेल्या वर्षापासून अंतिम मान्यता मिळण्याचे प्रलंबित आहे. त्यामुळे जिल्हा परिषदांमधील वर्ग-४ कर्मचा-यांच्या आरोग्य सेवक पदावर होणा-या पदोन्नत्या नाहक रखडलेल्या आहेत. त्याकरिता सदर प्रारूपास अंतिम मान्यता तात्काळ मिळावी, अशी महत्वाची मागणी आहे. ग्रामविकास विभाग अधिसूचना दि.७ मार्च २०२४ अन्वये नवीन सुधारीत सेवाप्रवेश नियम निर्गमित झाले असुन, त्यामध्ये रिक्त पदांचे भरतीचे प्रमाण ५०:४०:१० (५० टक्के सरळसेवेने, ४० टक्के पदोन्नतीने व १० टक्के वाहनचालकांमधून लिपीक-टंकलेखक) असे आहे. त्यानुसार पदोन्नतीने ४० टक्के भरावयाच्या जागांमध्ये जिल्हा परिषद परिचर वर्ग-४ कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक वर्ग-३ पदांवर पदोन्नती देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे राज्यातील बहुतांशी जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद परिचरांना कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नत्या झाल्या आहेत. मात्र, फक्त जिल्हा परिषद हिंगोली, चंद्रपुर जिल्हा परिषदांमधील परिचरांच्या कनिष्ठ सहाय्यक पदावर पदोन्नत्या दिल्या जात नाहीत. त्यासाठी संघटनेचे राज्याध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी सतत मा.प्रधान सचिव, मा.उपसचिव यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. तसेच या प्रकरणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना शासन स्तरांवरूनदेखील पत्रव्यवहार झालेला आहे. तरीदेखील मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणी दखल घेत नाहीत. तरी महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा परिषदांमध्ये परिचर वर्ग-४ पदांवरुन आरोग्यसेवक वर्ग-३ पदांवर पदोन्नती करिता २५ टक्के पदे

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at: Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ । पान ७

# थेरगावमध्ये कडकडीत बंद आणि मोर्चा

## नागरिकांचा विकास आराखड्यावर तीव्र विरोध

पिंपरी चिंचवड - सिद्धांत चौधरी

थेरगाव बहुउद्देशीय नागरिक संघाच्या पुढाकारातून सोमवारी थेरगावमध्ये कडकडीत बंद आणि मोर्चाचे आयोजन करण्यात आले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने तयार केलेल्या प्रस्तावित प्रारूप विकास आराखड्यात (डीपी) २४, १२, १५ मीटर रुंदीचे रस्ते आणि ३० मीटर एचसीएमटीआर रस्ते थेरगावच्या १०० टक्के दाट वस्तीवरून नेण्याचा प्रस्ताव आहे. यामुळे अनेकांची घरे तोडली जाणार आहेत. या अन्यायकारक निर्णयाच्या विरोधात नागरिकांनी एकत्र येऊन बंद आणि मोर्चा काढला.

थेरगाव बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. संपूर्ण गावात कडकडीत बंद पाळण्यात आला. सकाळी ११ वाजता थेरगाव १६





पासून मोर्चा निघून गावठाणातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सांगता झाली. या मोर्चात सर्वपक्षीय नेतेही सहभागी झाले. पक्षीय गट-तट बाजूला ठेवून सर्व पक्षांचे कार्यकर्ते आणि गावकरी एकत्र आले.

मोर्चादरम्यान घर आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं?, खासदार साहेब आमचं घर वाचवा, आमदार साहेब आमची शाळा वाचवा अशा घोषणा देण्यात आल्या. काही नागरिकांनी या जुलमी प्रशासनाचं करायचं काय? - खाली मुंडकं वर पाय अशा तीव्र शब्दांत निषेध फलक हातात घेतले होते.

थेरगाव बहुउद्देशीय नागरिक संघाच्या समितीने सांगितले की, मनपा प्रशासन आणि राज्य शासनाने स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता, कुठलाही भौगोलिक सर्व्हे न करता, केवळ गुगल मॅपवरून अन्यायकारक हुकूमशाही पद्धतीने हा विकास आराखडा तयार केला आहे. घरे तोडून कुठे विकास असतो? लोकांना बेघर करून केलेला विकास उपयोगाचा नाही, असा सवाल नागरिकांनी केला.मोर्चात मोठ्या संख्येने गावकरी सहभागी झाले. त्यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासनच जबाबदार राहील.पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक आयुक्त शिखर सिंह यांनी या नागरिकांच्या मागण्यांकडे लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी थेरगावकरांची कळकळीची मागणी आहे. आता प्रशासन याची दखल घेते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# दौंड हादरलं! महामार्गावर गाडी अडवून कुटुंबाला लुटले, अल्पवयीन मुलीवर अत्याचार

रावणगाव । प्रतिनिधी

**पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर देवदर्शनासाठी निघालेल्या एका कुटुंबाला अडवून कोयत्याचा धाक दाखवून लुटल्याची धक्कादायक घटना स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथे घडली आहे. इतकेच नाही, तर नराधमांनी यातील एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याने महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी बलात्कार, चोरी अशा विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.**

बारामती विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवारी (दि. ३०) पहाटे साडेचारच्या सुमारास घडली. एक कुटुंब आपल्या चारचाकी वाहनाने प्रवास करत असताना चहा पिण्यासाठी स्वामी चिंचोली येथे



थांबले होते. चहा घेऊन ते पुन्हा गाडीत बसत असताना, दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांना अडवले.

हल्लेखोरांनी कुटुंबातील महिला आणि पुरुषांच्या गळ्याला कोयता लावून जीवे मारण्याची धमकी दिली. एकाने त्यांच्याकडील सर्व सोन्या-चांदीचे दागिने हिसकावून घेतले. चोरट्यांनी गाडीतील महिलांच्या अंगावरील एकूण दीड लाख रुपयांचे दागिने चोरले.

मुलीवर अत्याचार

लुटमार करत असताना यातील एका चोराने गाडीतील अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने काही अंतरावर ओढत नेऊन तिच्यावर अत्याचार केला. चहासाठी जिथे थांबले होते त्याच्या लगत झाडझुडपं आहेत. चोरट्यांनी पीडित मुलीला फरफटत झाडझुडपांमध्ये नेलं. या अमानुष घटनेमुळे कुटुंबाला मानसिक धक्का बसला आहे. दौंड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. दौंड पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अज्ञात आरोपींचा कसून शोध घेत आहेत.

# वृद्ध महिलेला मिळाले न्यायाचे मंगळसूत्र; शिरूर पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

शिरूर : समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडताना शिरूर पोलीसांनी पुन्हा एकदा आपली तत्परता व कर्तव्यदक्षता सिद्ध केली आहे. पायी चालणाऱ्या ७७ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील दिड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढणाऱ्या चोरट्यांकडून पोलीसांनी सदर मंगळसूत्र हस्तगत करून ते न्यायालयाच्या आदेशानुसार मूळ मालकिणीच्या सुपूर्त केले आहे.

ही घटना दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. मौजे संविदणे (ता. शिरूर) गावच्या हद्दीत मलठण-नारायणगाव अष्टविनायक हायवे रोडवरील बंटी हॉटेलच्या पुढे असलेल्या रस्त्यावरून धुमाळस्थळाकडे चाललेल्या वस्त्सलाबाई दत्तात्रय सुके (वय ७७, रा. खडकवाडी, ता. आंबेगाव) या वृद्ध महिलेच्या गळ्यातील दिड तोळ्याचे, अंदाजे १,१०,०००/- रूपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र दोन अज्ञात इसमांनी जबरदस्तीने हिसकावून मोटारसायकलवरून पलायन केले होते. या





घटनेनंतर शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस निरीक्षक दिपक करांडे आणि पोलीस अंमलदार भाउसाहेब ठोसरे यांनी तपासाची चोख भूमिका बजावत, आरोपी १) अनिल सोमनाथ गव्हाणे आणि २) अनिल नारायण गव्हाणे (दोघेही रा. गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांना अटक करून त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले मंगळसूत्र जप्त केले. प्रकरणातील जप्त मंगळसूत्र न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ३० जून २०२५ रोजी वस्त्सलाबाई दत्तात्रय सुके यांना अधिकृतपणे सुपूर्त करण्यात आले.

या उल्लेखनीय कामगिरीमागे पोलीस अधीक्षक संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, तसेच शिरूर पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. कारवाईमध्ये पोलीस हवालदार बापु मांगडे आणि पोलीस अंमलदार भाउसाहेब ठोसरे यांचे मोलाचे योगदान राहिले. शिरूर पोलिसांची ही तातडीने व काटेकोर केलेली कारवाई समाजात सुरक्षिततेचा विश्वास वाढवणारी ठरली आहे.

# दत्तात्रेय गाडेचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

पुणे - स्वारगेट बस स्थानकातील बसमध्ये तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे याचा जामीन अर्ज सोमवारी न्यायालयाने फेटाळला. गुरुवारी (ता. २६) गाडे याच्या जामीन अर्जावर आरोपी पक्षासह बचाव पक्षाच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला होता. त्यावर, यांच्या सत्र न्यायाधीश ए. एस. गांधी यांच्या न्यायालयाने हा आदेश दिला.

न्यायालयीन कोठडी सुनावल्याने येरवडा कारागृहात असलेल्या गाडे याने जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला. त्यास सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसार व तरुणीच्या वकील श्रीया आवले यांनी विरोध केला होता. लैंगिक



अत्याचार तरुणीच्या इच्छेविरुद्ध व तिच्या संमतीशिवाय केला गेलेला आहे. तपास यंत्रणेचे म्हणणे व आरोपपत्रातील तपशील यांचा संदर्भ देत विशेष सरकारी वकिलांनी असे निर्देशित केले की, काही अत्यंत महत्त्वाचे व निर्णायक पुरावे तपासात आले आहेत.

तरुणीच्यावतीने ॲड. श्रीया आवले यांनी असा युक्तिवाद केला की, आरोपीने यापूर्वी तरुणीची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केलेला असून तो पुन्हा तसे करू शकतो. तर, आरोपी व तरुणी यांच्यातील संबंध परस्पर संमतीने झालेले आहेत. असे कोणतेही कृत्य घडलेच नाही. आरोपीचे पूर्वीचे गुन्हे हे स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराचे नसून, चोरी व दरोड्याचे असल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आला होता.

स्वारगेट बसस्थानकात २५ फेब्रुवारीला पहाटे एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्काराची घटना घडली होती. आरोपीने साताऱ्याची बस तिकडे लागते अशी दिशाभूल करून तरुणीवर बंद पडलेल्या शिवशाही बसमध्ये नेऊन बलात्कार केला होता.

आरोपी व तरुणीत आर्थिक व्यवहार झालेला नाही -

या पुराव्यांमध्ये विविध पंचनामे, तज्ज्ञांचे अभिप्राय, लोकेशन ट्रेसेस इत्यादींचा समावेश होता जे स्पष्टपणे दर्शवितात. आरोपी व तरुणी यांच्यात पूर्वी कोणताही संपर्क नव्हता व त्यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही, असे ड. मिसार यांनी न्यायालयात नमूद केले.

# जुन्नरच्या रमेश खरमाळे यांचं 'मन की बात'मध्ये खास कौतुक

पुणे । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी आकाशवाणी वर 'मन की बात' मधून देशाशी निगडीत एका विषयावर देशवासियांशी संवाद साधतात. या महिन्यात जागतिक पर्यावरम दिन (दि. ५ जून) झाल्याने हा विषय त्यांनी 'मन की बात'च्या १२३ व्या भागात निवडला.

त्यात त्यांनी जुन्नरचे सुपूत्र वनरक्षक सेवानिवृत्त मेजर 'रमेश खरमाळे' कुटुंबासह करीत असलेल्या पर्यावरण रक्षण व संवर्धनाच्या कार्याचा गौरवाने उल्लेख केला. त्यामुळे जुन्नरसह पुणे जिल्हाच नाही, तर महाराष्ट्राची आज देशभर चर्चा झाली. सध्या सोशल मीडियावर देखील 'रमेश खरमाळे' यांची चर्चा होताना दिसत आहे.

मन की बातच्या १२३ व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, पुण्याचे रमेश खरमाळे आपल्या कुटुंबासह जुन्नरच्या टेकड्यांवर जायचे, झुडपे साफ करायचे, पाणी वाचवण्यासाठी खंदक खोदायचे आणि बियाणे पेरायचे. फक्त दोन महिन्यांत त्यांनी ७० खंदके, असंख्य तलाव बनवले ते एक ऑक्सिजन पार्क देखील तयार करत आहेत आणि परिणामी, पक्षी परत येत आहेत, वन्यजीवन पुनरुज्जीवित होत आहे ते ४९ वर्षांचे माजी सैनिक आहे आणि वनरक्षक बनले आहे. त्यांनी आपल्या कुटुंबासह पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील एका टेकडीचे पुनरुज्जीवन केले. जुन्नर तालुक्यातील खोडद गावातील खरमाळे हे भारतीय सैन्यात सेवा बजावत होते आणि २०१२ मध्ये निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी दोन वर्षे बँकेत काम केले, परंतु त्यांना त्या नोकरीत समाधान मिळाले नाही. नंतर त्यांनी जुन्नरमध्ये एक अकादमी सुरू केली, ज्याद्वारे अनेक तरुणांना सैन्यात यशस्वीरित्या भरती करण्यात आले. तथापि, तिथेही त्यांना खरोखर समाधान वाटले नाही. अखेर त्यांनी वन विभागाची परीक्षा दिली आणि वनरक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, जिथे त्यांना अखेर त्यांचे काम सापडले.

# लोणावळा एक्स्प्रेस वे'वर कारला अपघात; सुमारे ७०० किलो प्राण्यांचे मांस जप्त

लोणावळाः पुणे ते मुंबई एक्स्प्रेस वेवर खंडाळा गावाच्या हद्दीत एक कारचा अपघात झाल्याची घटना समोर आली. या अपघातानंतर पोलिसांनी कारमधून अंदाजे ७०० किलो प्राण्याचे मांस जप्त केले आहे. एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे ४ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लोणावळा शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. एक्स्प्रेस वेवरील किलोमीटर क्र. ४५ जवळील बोगद्याच्या समोरील यू-टर्नजवळ या कारने सिमेंट डिव्हायडरला जोराची धडक दिली. अपघातानंतर कारचा चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

पोलिस नोंदीनुसार, कारच्या मागील भागात काळ्या प्लास्टिकमधून झाकलेले प्राण्याचे कातडी काढलेले मांसाचे भाग आढळले. अंदाजे ७०० किलो मांसाची किंमत २ लाख ८० हजार, तर डस्टर कारची किंमत २ लाख ६० हजार असून, एकूण मुद्देमाल ४ लाख इतका आहे. याप्रकरणी लोणावळा शहर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर २५६/२०२५ नोंदवण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक राजेश रामाघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स.इ. सूर्यकांत वाणी यांच्या नेतृत्वाखाली पुढील तपास सुरू आहे. आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

# महिला सरपंचाच्या पतींची लुडबूड; ग्रामपंचायत सदस्यांमध्ये नाराजी

मंचरः आंबेगाव तालुक्यातील बहुतांशी गावात महिला सरपंचपदाचे आरक्षण आहे. जनतेतून लोकनियुक्त सरपंचपदी महिला विराजमान झाल्या आहेत. परंतु, बहुतांशी गावामध्ये महिलां सरपंचाचे पतीच सरपंच असल्याच्या तोऱ्यात वावरताना दिसत आहेत. महिला सरपंच पतींची ग्रामपंचायतीच्या कारभारामध्ये लुडबूड वाढल्याने ग्रामपंचायत सदस्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

महिला सरपंचांचे पती ग्रामपंचायत कर्मचारी, सदस्य व विरोधकांना विचारात न घेता आपली मनमानी चालवत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांमध्ये नाराजीची भावना आहे. काही ग्रामपंचायतीमध्ये अविश्वास ठराव दाखल करण्याच्या हालचाली सुरू आहेत. महिला सरपंचांचे पती ग्रामपंचायत कारभारामध्ये लक्ष घालत असल्याने सदस्यांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे. काही महिला सरपंचांचे पती, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांना विश्वासात न घेता ग्रामसेवकांशी संगनमत करून परस्पर ग्रामपंचायतीची कामे मार्गी लावताना दिसत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत कर्मचारी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य या सर्वांमध्ये महिला सरपंच व त्यांच्या पतीविरोधात नाराजीचा सूर आहे.

याबाबतच्या तक्रारी स्थानिक आमदारांपर्यंत जाऊ लागल्या आहेत. काही गावांमध्ये ग्रामसभेत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्यामध्ये हमरीतुमरी होत आहे. काही गावांमध्ये महिला सरपंचांचे पतीच ग्रामपंचायत माध्यमातून होणारी कामे स्वतः ठेकेदारामार्फत करून घेत आहेत.

बहुतांश ठिकाणी महिला सरपंच या फक्त कागदोपत्री सही करत असून त्यांच्या पदाचा कारभार हे त्यांचे पती पहात आहेत. महिला आरक्षण घटनेने दिले असले तरी यामागचा उद्देश पतींच्या ग्रामपंचायतीतील हस्तक्षेपामुळे सफल झालेला दिसत नाही. काही ठिकाणी महिला सरपंच ग्रामपंचायत पदाधिकार्यांना जुमानत नसल्याने डोकेदुखी होऊन बसली आहे. त्याचा परिणाम गावाच्या विकास कामांवर होत आहे.

# हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाच्या अनागोंदीविरोधात शिवसेनेचे तीव्र आंदोलन

हडपसर : आज हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयातील बेजबाबदार, अकार्यक्षम आणि बेशिस्त प्रशासनाविरोधात नागरिकांचा संताप अखेर उफाळून आला.याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने आज पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात आले. शेकडो संतप्त नागरिकांनी या आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली, ज्यामुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले.

शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास तुपे, उपजिल्हाप्रमुख अमर घुले यांच्यासह अनेक पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले. पिण्याच्या पाण्यात दूषितपणा, रस्त्यांवरील



बेकायदा अतिक्रमणे, बायोमेट्रिक यंत्रणेची बंद अवस्था, अधिकाऱ्यांची अनुपस्थिती आणि नागरी समस्यांकडे दुर्लक्ष यासारख्या मुद्द्यांवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि अंगीकृत संघटनांनी एकत्र येत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात ठोस पावले उचलली. आंदोलनादरम्यान नागरिकांनी आपले त्रासदायक अनुभव माध्यमांसमोर मांडत प्रशासनाचा खरपूस समाचार घेतला.

विशेष म्हणजे, आंदोलकांनी क्षेत्रीय कार्यालयातच भाजीपाला आणि फळांचे स्टॉल थाटून ठिय्या मांडला, ज्यामुळे कार्यालय परिसर काही काळ अतिक्रमित बाजारपेठेसारखा दिसू लागला.

हडपसर-मुंढव्यातील नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे त्रस्त आहेत. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही होत नाही. दूषित पाणी, अतिक्रमणे आणि अधिकाऱ्यांची बेजबाबदारी यामुळे यंत्रणा कोलमडली आहे. येत्या आठ दिवसांत प्रशासनाने सुधारणा न केल्यास शिवसेना अधिक तीव्र आंदोलन करेल आणि प्रशासनाला वठणीवर आणेल, असे शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी ठणकावून सांगितले.

# मोबाईल पने 'वश' करायचा, अंग चोळून आंघोळ अन् शरीरसंबंध ठेवणारा पुण्यातील समलैंगिक बाबाचं बिंग फुटलं

**पुणे । प्रतिनिधी**

भक्तांच्या मोबाईलमध्ये छुप्या पद्धतीने प डाउनलोड करून त्यांना अश्लील कृत्ये करायला लावणारा प्रसाद बाबा उर्फ प्रसाद तामदार हा समलैंगिक असल्याचं पोलीस तपासात समोर आलंय . पुण्यातील सुस भागात मठ असलेल्या प्रसाद बाबाने आपल्याशी लैंगिक चाळे केल्याची तक्रार त्याच्या एका भक्ताने केल्यानंतर त्याच्याविरोधात तक्रार देण्यासाठी आणखी पंधरा तरुण समोर आलेत.

पुरुष भक्ताचे अंग चोळून त्याला अंघोळ घालणारा प्रसाद बाबा उर्फ प्रसाद तामदारच प्रस्थ गेल्या काही वर्षांत पुणे आणि परिसरात वाढलं होते. इंस्टाग्रामवर या बाबाचे दीड लाखांहून अधिक फॉलोअर्स होते . त्यांच्या कमेंट्स पाहून प्रसाद बाबा आपल्याही आयुष्यातील अडचणी दूर करेल या अपेक्षेने भक्तांची गर्दी त्याच्या या पुण्यातील सुस मधील ब्रह्मांडनायक वाढत चालली होती.

प्रसादचे वडील भीमराव दातीरने दिव्य साक्षात्कार झाल्याचा दावा करत हा मठ काही वर्षांपूर्वी सुरु केला. पुढे सी ए पर्यंतच शिक्षण झाल्याचा दावा करणारा प्रसादने २०२२ मध्ये स्वतः या मठात बाबा बनण्याचा निर्णय घेतला . मात्र, त्याचा हा निर्णय भक्तांकडून पैसे उकळण्याबरोबरच त्यांच्याशी समलैंगिक संबंध प्रस्थापित करता यावेत यासाठी होता. त्यासाठी प्रसाद बाबा त्याच्या मठात आलेल्या भक्तांचे मोबाईल फोन मागून घ्यायचा. ग्रहदोष असल्याने मोबाईलमध्ये कंपास प डाउनलोड करावं लागेल असं कारण तो द्यायचा . मात्र ते प डाउनलोड



करताना तो एअर ड्रॉइड कीड हे आणखी एक प चोरून डाउनलोड करायचा . पालकांना आपल्या मुलांवर आणि त्यांच्या मोबाईल एक्टिव्हीटीवर नजर ठेवता यावी यासाठी या एअर ड्रॉइड कीड या एपची निर्मिती करण्यात आलीय . या एपमुळे भक्ताच्या संपूर्ण मोबाईलचा एक्सेस प्रसाद बाबाला मिळायचाच . भक्ताच्या मोबाईलमधील कॅमेरातून दिसणारी सगळी माहिती तो गोळा करायचा आणि त्याचा उपयोग भक्ताला प्रभावित करण्यासाठी करायचा . आपण आज कोणत्या रंगाचे कपडे घातले आहेत आणि आज आपण कुठे कुठे गेलो होतो हे सर्व प्रसाद बाबाला दिव्य साक्षात्कार झाला असल्याने समजल्याच भक्तांना वाटायचं आणि त्यांचा प्रसाद बाबावरचा विश्वास आणखीनच दृढ व्हायचा. त्यानंतर प्रसाद बाबा विश्वास संपादन केलेल्या तरुण भक्तांना सलग दोन दिवस केवळ तीन तास झोप घेण्याचा सल्ला द्यायचा . त्यानंतर त्या भक्ताला या मठात बोलावून पुढच्या अघोरी विद्येच्या क्रिया करण्यासाठी सर्व कपडे काढून फक्त शाल पांघरून झोपायला सांगायचा . सलग दोन दिवस झोप न मिळाल्याने तो भक्त झोपी गेला की प्रसाद बाबा त्याच्यासोबत लैंगिक चाळे सुरु करायचा आणि तो भक्त जागा झाल्यावर तुझ्या सगळ्या समस्या माझ्याकडे घेतो आहे, असं सांगत त्या भक्ताला लैंगिक संबंध ठेवायला भाग पडायचा.

पुणे जिल्ह्यातील देहूरोड भागातील जे ३९ वर्षांच्या बांधकाम व्यवसायिकाच प्रसाद बाबाने असंच लैंगिक शोषण केलं . तसाच प्रकार प्रसाद बाबाने त्या बांधकाम व्यवसायिकाच्या मेहुण्यासोबत करण्याचा प्रयत्न केला असता एअर ड्रॉयर पमुळे त्या मेहुण्याच्या मोबाईलमधील मेमरी फुल झाल्याचं नोटिफिकेशन आलं आणि बाबाच बिंग फुटलं . त्यानंतर या बांधकाम व्यवसायिकाने आणि त्याच्या मेहुण्याने पोलिसांकडे तक्रार दिली आणि पोलिसांनी प्रसाद बाबाला बेड्या ठोकल्या

cmyk